पाक्षिक

मनोगत

प्रदेश बीजेपी

मुंबई । वर्ष: 6 । अंक: 17 । 1 सप्टेंबर , 2024 । पृष्ठसंख्या: 36 । किंमत: 5 रू.

लाडका देवाभाऊ

अध्यक्षीय मनोगत

लाडक्या बहिणींचा लाडका देवाभाऊ

भारतीय जनता पार्टी महायुती सरकारने लागू केलेल्या लाडकी बहीण योजनेमुळे राज्यातील महिलांमध्ये आनंदाची लाट आली आहे. पात्र महिलांना दरमहा दीड हजार रुपये थेट खात्यात जमा करण्याच्या या योजनेमुळे महिलांना बळ मिळाले आहे. त्यांना एक नवा आत्मविश्वास मिळाला आहे. त्यामुळेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांचा मेळावा राज्यात जेथे जेथे होतो तेथे महिला शक्तीचे दर्शन घडते. या कार्यक्रमातील महिलांचा उत्साह पाहण्यासारखा असतो. आपल्या नेत्यांना राखी बांधण्यासाठी महिला हिरीरीने पुढे येतात. यामुळेच सरकारबद्दल महिलांची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी लाडक्या बहिणींचा लाडका देवाभाऊ कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यामध्ये आपले नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानण्यात आले. मा. देवेंद्रजींच्या मुख्यमंत्रिपदाच्या २०१४ ते २०१९ या कालावधीत महिलांसाठी अनेक चांगली कामे करण्यात आली. आता पुन्हा राज्यात जून २०२२ मध्ये महायुतीचे सरकार सत्तेवर आल्यानंतर मा. देवेंद्रजींच्या नेतृत्वात अनेक योजना राबविण्यात येत आहेत. लाडकी बहीण योजना ही त्यापैकीच एक आहे. गरजू महिलांना तीन सिलिंडर मोफत देण्याची अन्नपूर्णा योजना, राज्य सरकारने फी भरून मुलींना मोफत उच्च शिक्षण मिळवून देण्याची योजना, महिलांना एसटी तिकिटात पन्नास टक्के सवलत अशा अनेक कल्याणकारी योजना आपल्या सरकारच्या आहेत. या योजनांमुळे महिलांना बळ मिळते याचा आनंद मानण्याच्या ऐवजी विरोधक मात्र केवळ राजकीय मतलब पाहून योजना बंद पाडण्याचा तसेच त्यांच्याविषयी गैरसमज पसरविण्याचा प्रयत्न करत आहेत. लाडकी बहीण योजनेला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. न्यायालयाने ती याचिका फेटाळली. पण आता पुन्हा एका काँग्रेस कार्यकर्त्याने उच्च न्यायालयात लाडकी बहीण योजना बंद करावी म्हणून याचिका दाखल केली आहे. पण तुमचा देवा भाऊ आहे. आम्ही उच्च न्यायालयात खटला पूर्ण निष्ठेने लढू आणि या योजना सुरू ठेवू, असे आश्वासन मा. देवेंद्रजींनी जाहीरपणे दिले आहे. लाडकी बहीण योजना बंद पाडण्याचा विरोधकांचा प्रयत्न हाणून पाडण्यासाठी आपले सरकार सर्वतोपरी प्रयत्न करेल. आपण संघटना म्हणून सरकारच्या पाठीशी उभे राहिले आहे व महिलांमध्ये याविषयी जागृती निर्माण केली पाहिजे. मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या दहा वर्षांच्या कारकिर्दीत महिलांना सबळ करण्यासाठी अनेक योजना यशस्वीपणे राबविल्या. आपल्या तिसऱ्या कारकिर्दीतही ते त्याच दिशेने पावले टाकत आहेत. मोदीजींच्या प्रधानमंत्री जनधन योजनेची दहा यशस्वी वर्षे नुकतीच पूर्ण झाली. या योजनेत देशातील ५३ कोटी लोकांची बँक खाती उघडली गेली व ते मुख्य आर्थिक प्रवाहात आले. या योजनेच्या प्रमुख लाभार्थी महिला आहेत. लाडकी बहीण योजना यशस्वी होण्यात जनधन योजनेचा मोठा वाटा आहे. त्यामुळेच महिलांच्या खात्यात थेट पैसे जमा झाले. गरीबांचे तारणहार ठरलेल्या मोदीजींचे जनधन योजनेच्या यशाबद्दल अभिनंदन.

चंद्रशेखर बावनकुळे

अंतरंग

०४ ... तोपर्यंत 'लाडकी बहीण योजना' कोणीही बंद करू शकणार नाही!

०६ लाडकी बहिण योजना बंद पाडण्यासाठीच बदलापूर घटनेचे राजकारण

१० महिला हिताय, महिला सुखाय

१५ शेतक-यांना मोफत वीज, मागेल त्याला सौरपंप

१८ जन-धन योजनेची 10 वर्षे

२७ अराजक निर्माण करण्याचे विरोधकांचे प्रयत्न

संपादक : गणेश हाके

सल्लागार : माधव भांडारी

आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.

संपादकीय सल्लागार

चंद्रहास मिरासदार

सजावट व मांडणी : गौतम आर्य

सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर

विभागीय समन्वयक

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी

विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे

पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर

उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई – ४००० २५ येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, मुंबई –२० येथे प्रकाशित केले. संपर्क : ०२२–२२०२२०५०

जोपर्यंत महायुतीचे सरकार आहे, तोपर्यंत 'लाडकी बहीण योजना' कोणीही बंद करू शकणार नाही!

● देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री

भाजपा मुंबई आयोजित 'लाडक्या बहिणींचा देवाभाऊ' या कार्यक्रमाचे अलिकडेच आयोजन करण्यात आले होते. 'लाडक्या बहिणींचा लाडका देवाभाऊ' या गाण्याचा शुभारंभ केला गेला. महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागातून व्हीसीद्वारे जोडलेल्या लाडक्या बहिणींशी संवाद साधला गेला. यादरम्यान बहिणींनी केलेल्या प्रेमाच्या वर्षावाने मन भारावून गेले. अनेकजण मला देवेंद्र, देवेन अशा वेगवेगळ्या नावाने बोलावतात. परंतु माझ्या बहिणींनी 'देवाभाऊ' अशी घातलेली साद मला जास्त आवडते.

मा. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या संकल्पनेतील विकसित भारताच्या निर्मितीकरीता महिलांना देशाच्या मुख्य प्रवाहात आणणे गरजेचे आहे. म्हणूनच मुख्यमंत्री एकनाथ शिंदेजी यांच्या नेतृत्त्वात महाराष्ट्रात महायुती सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, अन्नपूर्णा योजना (वार्षिक ३ मोफत सिलेंडर), महिला सन्मान योजना (अर्ध्या तिकिटात महिलांना प्रवासाची सोय), मुलींकरीता मोफत उच्च शिक्षण योजना यांसारख्या अनेक कल्याणकारी योजना सुरु केल्या आहेत.

रक्षाबंधनाच्या आधीच महाराष्ट्रातील १ कोटींपेक्षा जास्त बहिणींच्या खात्यात ओवाळणी म्हणून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे ३ हजार जमा झाले आहेत. 'आपले सरकार हे लेना बँक सरकार नसून देना बँक सरकार आहे. जोपर्यंत महायुतीचे सरकार आहे, तोपर्यंत ही योजना कोणीही बंद करू शकणार नाही'. त्यामुळे लाडक्या बहिणींनी सावत्र भावांच्या दिशाभूल करणाऱ्या बोलण्याकडे लक्ष देऊ नये.

महाविकास आघाडीतील नेत्यांचे 'लाडका मुलगा व लाडकी मुलगी' असे ब्रीदवाक्य आहे. त्यांच्याकडे केवळ या दोनच योजना चालतात. मात्र राज्यातील महायुतीचे

सरकार महाराष्ट्राला सक्षम करण्यासाठी अहोरात्र मेहनत करत आहे. विरोधकांचे तोंड हे रावणासारखे आहे. रावण जसा १० तोंडानी खोटे बोलायचा अगदी त्याचप्रमाणे विरोधक सुद्धा १० तोंडानी खोटे बोलत आहेत. परंतु आपण प्रभू श्री राम आणि छत्रपती शिवाजी महाराज यांना मानणारे लोक आहोत. त्यामुळे रयतेची सेवा करणे हाच आपला धर्म आहे आणि तो आपण निभावण्याचे काम करत आहोत.

पुन्हा एकदा सर्व लाडक्या बहिणींना रक्षाबंधनाच्या खूप-खूप शुभेच्छा...

विशेषतः मुरजी पटेल, चित्राताई वाघ व मुंबईच्या महिला आघाडीने इतका सुंदर सोहळा आयोजित केला त्याबद्दल त्यांचे मनापासून अभिनंदन. आज लाडक्या बहिणींनी बांधलेले राखीरुपी कवच घेऊन पुन्हा मैदानात उतरीन आणि वेगवेगळ्या नवीन योजना घेऊन येईन, असे आवाहन यावेळी केले.

(यावेळी मंत्री मंगल प्रभात लोढा, राष्ट्रीय सचिव विजयाताई राहटकर, मुंबई अध्यक्ष आ. आशिष शेलार, आ. भारतीताई लव्हेकर, आ. विद्याताई ठाकूर, आ. कॅप्टन तामिळ सेल्वन, आ. पराग आळवणी, आ. सुनील

राणे, आ. प्रवीण दरेकर, आ. प्रसाद लाड, आ. योगेश सागर, आ. अमित साटम, आ. राम कदम, आ. अतुल भातखळकर, आ. मिहीर कोटेचा, आ. कालिदास कोळंबकर, आ. राजहंस सिंह, माजी आमदार राज पुरोहित आणि इतर मान्यवर उपस्थित होते.)

लाडकी बहिण योजना बंद पाडण्यासाठीच बदलापूर घटनेचे राजकारण

● **चित्रा वाघ,** महिला मोर्चा प्रदेश अध्यक्ष

> मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेला मिळत असलेला प्रचंड प्रतिसाद पाहून घाबरलेल्या उबाठा, काँग्रेस आणि शरद पवार गटाने बदलापूर घटनेचे राजकारण सुरू केले आहे. या घटनेवरून राज्यात हिंसाचार माजवून अशांतता निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र बंदचे आवाहन केले गेले. महिलांना सक्षम करूनच देशाची आणि राज्याची प्रगती सुनिश्चित होऊ शकते.

हेच ओळखून आमच्या सरकारने 'लेक लाडकी योजना, महिलांना एसटी प्रवासाच्या दरामध्ये ५०% सूट देण्याचा तसेच मुलींच्या उच्च शिक्षणाची १००% फी भरण्याचा निर्णय घेतला. तसेच ६५ लाख कुटुंबे बचत गटाशी जोडून बचत गटांना सुमारे ९ हजार कोटी दिले. यासोबतच नुकत्याच सुरू केलेल्या 'लाडकी बहीण योजने'अंतर्गत महिलांना दरमहा १५०० देण्याचा निर्णय घेतला. राज्यातील १.२५ कोटी महिलांपर्यंत याचा लाभ नुकताच पोहोचला असून पुढच्या महिन्यापर्यंत २.५ कोटी महिलांना या योजनेचा लाभ मिळणार आहे.

महिलांच्या सन्मानाच्या अशा महत्त्वाकांक्षी योजनेला देखील विरोधकांमार्फत विरोध होऊन ही योजना बंद करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. परंतु विरोधकांनी कितीही प्रयत्न केला तरी देखील ही योजना बंद होणार नाही, कारण महिलांच्या आशीर्वादाने दरवर्षी याची बजेटमध्ये तरतूद असणारच आहे.

बदलापूर येथील घटना अत्यंत दुर्दैवी आहे. या घटनेतील आरोपींना कठोर शासन व्हावे, यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील आहे. बदलापूर घटनेतील आरोपीला तातडीने अटकही करण्यात आली आहे. तसेच या घटनेत निष्काळजीपणा दाखविणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांना बडतर्फही करण्यात आले आहे. महिला पोलीस अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथकाची नियुक्ती करण्यात आली आहे. हा खटला जलदगती न्यायालयात चालविण्यात येणार आहे. त्यासाठी विशेष सरकारी वकिलांची नियुक्तीही करण्यात आली आहे. राज्य सरकारने तातडीने हे निर्णय घेतले असताना या घटनेच्या निमित्ताने 'बंद'च्या आडून राज्यात हिंसाचार करण्याची खेळी महाविकास आघाडीकडून खेळली गेली होती.

बदलापूरसारख्या दुर्दैवी घटना मानवतेला काळीमा फासणाऱ्या आहेत परंतु अशा घटनांवर राजकारण करणे यापेक्षा दुसरी संवेदनहीनता असू शकत नाही. या घटनांच्या आरोपींना फाशीपर्यंतच्या कठोर शिक्षा मिळेपर्यंत आम्ही शांत बसणार नाही. मुलगी कुठलीही असली तरीही ती आपली लेकच असते. कोलकाता सारख्या निर्घृण घटनेवर शांत बसलेले विरोधक महाराष्ट्राच्या गृहमंत्री आणि मुख्यमंत्र्यांचे राजीनामे मागत आहेत परंतु आम्ही लढणारे लोक आहोत, मैदान सोडणारे आणि रडणारे नाहीत. त्यांना राजकारण करू द्या. समाजातील ही कीड संपवावी लागेल.

लाडकी बहीण योजना बंद करण्यासाठी विरोधकांमार्फत आता या निर्घृण घटनांचा वापर होत आहे. 'या योजना राबवण्यापेक्षा महिलांना सुरक्षा द्या' असा कांगावा विरोधकांमार्फत सुरू आहे. यांचा इतिहास अशाच प्रकारे योजना थांबवण्याचा आहे. परंतु आम्ही महिलांना संरक्षण देखील देऊ आणि विकासाच्या योजना देखील राबवू. आमचे सरकार यांच्यासारखे स्थगितीमान नाही गतिमान सरकार आहे. आमच्या गतिमान सरकारला नारीशक्तीचा आशीर्वाद मिळेल हा विश्वास आहे. ■

पाक्षिक मनोगत प्रदेश बीजेपी

मुंबई येथे लाडक्या बहिणींचा देवाभाऊ कार्यक्रम– उपस्थिती–
उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राष्ट्रीय सचिव विजयाताई रहाटकर, रोजगार मंत्री मंगलप्रभात लोढा, आ. प्रविण दरेकर, मुंबई अध्यक्ष आ. आशिष शेलार, मुंबई उपाध्यक्ष संजय उपाध्याय, महिला मोर्चा प्रदेश अध्यक्ष चित्राताई वाघ, आ. अतुल भातखळकर, आ. भारतीताई लव्हेकर, आ. विद्याताई ठाकूर, आ. अमित साटम, आ. पराग आळवणी, आ. कालिदास कोळंबकर, आ. प्रसाद लाड, भाजप नेते राजहंस सिंह आदी.

'साहेब, ही गरिबाघरची राखी'

● विजय धुमाळ हे नगर जिल्ह्यातील नेवासा तालुक्यातील चांडा येथील रहिवासी. ४१ वर्षांचे आहेत. विजय धुमाळ यांना हृदयविकाराचा त्रास होता. त्यामुळे त्यांचे हृदय प्रत्यारोपण करावे लागले. त्यांच्या उपचाराचा संपूर्ण २३ लाख रुपये खर्च हा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वैद्यकीय सहायता कक्षामार्फत करण्यात आला. विजय धुमाळ हे बांधकाम मजूर असून, त्यांची पत्नी विद्याताई या शेतमजूर आहेत. या कुटुबांचे उत्पन्न वार्षिक अवघे ३१ हजार रुपये. त्यामुळे त्यांना उपचारापासून वंचित रहावे लागले होते.

● भाजपाच्या एका कार्यकर्त्याने देवेंद्र फडणवीस यांना एसएमएस केला आणि देवेंद्र फडणवीस यांनी तात्काळ या कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांना उपचार मिळवून देण्याच्या सूचना केल्या. धर्मदाय आरोग्य कक्ष हा विधी व न्याय विभागांतर्गत काम करतो.

● धुमाळ दामत्याला दोन मुली आणि एक मुलगा आहे. अत्यंत हालाखीच्या परिस्थितीत हे कुटुंब जीवन जगते. अशात या आरोग्याच्या संकटाने ते पूर्णत: कोलमडून गेले होते. त्यांना नगरमधील मोरया क्लिनीकमध्ये दाखल करण्यात आले होते.

● देवेंद्र फडणवीस यांच्या वैद्यकीय सहायता कक्षाने त्यांना रुबी क्लिनीक पुणे येथे हलविले आणि तेथे हृदय प्रत्यारोपण करण्यात आले. आता त्यांची प्रकृती ठणठणीत आहे. राखी पोर्णिमेदिवशी त्यांच्या पत्नीने देवेंद्र फडणवीस यांना राखी बांधली. राखी बांधताना विद्या धुमाळ म्हणाल्या की, ''साहेब ही गरिबा घरची राखी आहे.'' यावर देवेंद्र फडणवीस म्हणाले, तीच महत्त्वाची आहे. ■

महिला हिताय, महिला सुखाय

> देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री असताना व त्यानंतर महायुती सरकारने महिला हिताच्या अनेक योजना सुरू केल्या. या विविध योजनांचा व सरकारच्या निर्णयांचा आढावा...

मुलींना मोफत उच्च शिक्षण

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, वैद्यकीय तसेच कृषि विषयक सर्व व्यावसायिक पदवी-पदविका अभ्यासक्रमांसाठी प्रवेशित. ८ लाख रूपयापर्यंतच्या वार्षिक कौटुंबिक उत्पन्न असणाऱ्या इतर मागासवर्ग तसेच, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्कामध्ये १०० टक्के प्रतिपूर्ती. या निर्णयाचा अंदाजे २ लाख ५ हजार ४९९ मुलींना लाभ-सुमारे २ हजार कोटी रुपयांचा भार.

मुलींना मोफत शिक्षण-राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशतः अनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये, तंत्रनिकेतने, सार्वजिनक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रांमधील अभ्यासक्रमांमधील मुलींना या निर्णयाचा लाभ मिळेल. आर्थिक क्षमता नसलेल्या पाल्यांना आता मुलींच्या शिक्षणाचे स्वप्न पूर्ण करताना आर्थिक बोजा सहन करावा लागणार नाही.

लाडकी बहीण योजना

- सदर योजनेत अर्ज करण्याची मुदत दि.१ जुलै, २०२४ ते १५ जुलै, २०२४ पर्यंत ठेवण्यात आली होती. या मर्यादेत सुधारणा करण्यात येत असून आता सदर मुदत २ महिने ठेवण्यात येत असून ती दि. ३१ ऑगस्ट, २०२४ पर्यंत लाभार्थी महिलांना अर्ज करता येईल. तसेच दि. ३१ ऑगस्ट, २०२४ पर्यंत अर्ज करण्यात आलेल्या लाभार्थी महिलांना दि.०१ जुलै, २०२४ पासून महिन्याला रु.१५००/- आर्थिक लाभ देण्यात येणार आहे.
- या योजनेच्या पात्रतेमध्ये अधिवास प्रमाणपत्र आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले होते. आता लाभार्थी महिलेकडे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसेल तर त्या ऐवजी १५ वर्षापूर्वीचे १. रेशन कार्ड २. मतदार ओळखपत्र ३. शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र ४. जन्म दाखला. या चारपैकी कोणतेही ओळखपत्र/प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येणार आहेत.

लाभार्थी महिलांचा वयोगट २१ ते ६० वर्ष वयोगट ऐवजी २१ ते ६५ वर्ष वयोगट करण्यात येत आहे.

● परराज्यात जन्म झालेल्या महिलांनी महाराष्ट्रातील अधिवास असणाऱ्या पुरुषाबरोबर विवाह केला असेल तर अशा बाबतीत त्यांच्या पतीचे १. जन्म दाखला २. शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र ३. अधिवास प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येईल.

● रु.२.५ लक्ष उत्पन्न दाखला उपलब्ध नसेल तर ज्या कुटुंबाकडे पिवळे व केशरी रेशनकार्ड उपलब्ध असेल त्यांना उत्पन्नाच्या दाखला प्रमाणपत्रातून सुट देण्यात आली आहे.

● सदर योजनेत कुटुंबातील एका पात्र अविवाहित महिलेला सुध्दा या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे.

लेक लाडकी योजना

● पिवळ्या व केशरी रेशनकार्डधारक कुटुंबात मुलीचा जन्म झाल्यावर ५ हजार रुपये.

● इयत्ता पहिलीत गेल्यावर ६ हजार रुपये.

● सहावीत गेल्यावर ७ हजार रुपये.

● ११ वीत गेल्यावर ८ हजार रुपये.

● १८ वर्षे पूर्ण झाल्यावर ७५ हजार रुपये.

● अशा रितीने एकूण त्या मुलीस १ लाख १ हजार रुपये एवढा लाभ मिळणार आहे.

● शासनामार्फत थेट लाभार्थी हस्तांतरण (DBT) द्वारे लाभाची रक्कम लाभार्थ्यांना अदा करण्यात येणार आहे.

● १ एप्रिल २०२३ नंतर कुटुंबात जन्मणाऱ्या १ अथवा २ मुलींना त्याच प्रमाणे १ मुलगा व १ मुलगी असल्यास मुलीला या योजनेचा लाभ मिळेल.

● दुसऱ्या प्रसुतीच्यावेळी जुळी अपत्ये जन्माला आल्यास १ मुलगा किंवा दोन्ही मुलींना या योजनेचा लाभ मिळेल.

● पहिल्या अपत्याच्या तिसऱ्या हप्त्यासाठी व दुसऱ्या अपत्याच्या दुसऱ्या हप्त्यासाठी अर्ज सादर करताना माता, पित्याने कुटुंब नियोजन प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.

अन्नपुर्णा योजना– ३ सिलेंडर मोफत

● वर्षाला घरटी तीन गॅस सिलेंडर मोफत देणार– ५२ लाख १६ हजार ४१२ लाभार्थी कुटुंबांना लाभ.

● लखपती दिदी– महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत ७ लाख नवीन गटांची स्थापना–बचत गटांच्या फिरत्या निधीच्या रकमेत १५ हजार रुपयांवरुन ३० हजार रुपये वाढ.

● महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना ‘उमेद मार्ट’ आणि ‘ई–कॉमर्स ऑनलाईन प्लॅटफॉर्म’ याद्वारे आतापर्यंत १५ लाख महिला ‘लखपती दिदी’, या वर्षात २५ लाख महिलांना लखपती करण्याचे उद्दीष्ट.

● रुग्णांची विशेषतः गरोदर माता व बालकांची आरोग्य संस्थेत मोफत ने–आण करण्यासाठी ३ हजार ३२४ रुग्णवाहिका.

● महिला लघुउद्योजकांसाठी ‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना’– अखिल भारतीय स्तरावरील महासंमेलनाचे राज्यात आयोजन.

● ‘आई योजनेअंतर्गत’ पर्यटन क्षेत्रातील महिला लघुउद्योजकांना १५ लाख रुपयापर्यंतच्या कर्जावरील व्याजाचा परतावा–१० हजार रोजगार निर्मिती.

प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेतून पहिल्या जिवंत अपत्यापर्यंत रू. ५ हजाराचे आर्थिक सहाय्य दोन टप्प्यांमध्ये दिले जाते. ज्या महिलांचे निव्वळ कौटुंबिक उत्पन्न प्रतिवर्ष रू. ८ लाख पेक्षा कमी आहे, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या महिला, ज्या महिला अंशतः (४०%) किंवा पूर्ण अपंग आहेत (दिव्यांग जन), बीपीएल शिधापत्रिकाधारक महिला, आयुष्मान भारत अंतर्गत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत महिला लाभार्थी, ई–श्रम कार्ड धारण करणाऱ्या महिला, किसान सन्मान निधी अंतर्गत लाभार्थी महिला शेतकरी, मनरेगा जॉब कार्ड घेतलेल्या महिला, गर्भवती, स्तनपान करणाऱ्या अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस, आशा कार्यकर्ती हे या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र लाभार्थी आहेत.

महिलांना आधार देणाऱ्या निवासी योजना

सखी वन स्टॉप सेंटर– अन्यायग्रस्त पीडित महिलेस वैद्यकीय सुविधा, पोलीस मदत केंद्र, समुपदेशन केंद्र व कायदेशीर मदत तातडीने एका छताखाली उपलब्ध होण्याकरता सखी वन स्टॉप सेंटरची स्थापना करण्यात आली आहे. हे केंद्र २४ तास सेवा पुरवण्यासाठी उपलब्ध असून केंद्रामध्ये महिलांना त्यांच्या मुलांसमवेत प्रवेश देण्याची सोय आहे. यामध्ये महिलेसोबत तिची १८ वर्षापर्यंतची मुलगी व ८ वर्षापर्यंतचा मुलगा तिच्यासोबत

सेंटरमध्ये राहू शकतो अशी तरतूद या योजनेत केली आहे. वन स्टॉप सेंटरमध्ये पीडित महिलेला जास्तीत जास्त पाच दिवस राहता येते. त्यानंतर आवश्यकतेनुसार या महिलेस स्वाधारगृहात प्रवेश देण्यात येईल. एका वेळेस या केंद्रामध्ये पाच महिलांना राहता येईल.

शक्ती सदन

या योजनेअंतर्गत निराधार, विधवा, परितक्त्या, कौटुंबिक हिंसाचारग्रस्त तसेच अनैतिक व्यापारामधून सुटका करण्यात आलेल्या १८ ते ६० वयोगटातील महिलांना तीन वर्षापर्यंत निवासाची सोय उपलब्ध आहे. सांगली जिल्ह्यात भगिनी निवेदिता प्रतिष्ठान, यशवंतनगर, सांगली, मदर टेरेसा मागासवर्गीय महिला विकास मंडळ, उज्वलागृह माधवनगर, सांगली या दोन संस्था कार्यरत आहेत.

सखी निवास

नोकरी करणाऱ्या व नोकरी प्रशिक्षण घेणाऱ्या महिलांकरिता सखी निवास नावाने योजना राबविण्यात येते. ५० हजार पर्यंत वेतन असणाऱ्या महिला या वसतिगृहामध्ये प्रवेश घेऊ शकतात. वसतिगृहाचे शुल्क महिलेच्या वेतनाच्या ७.५ टक्के ते १५ टक्क्यांपर्यंत आकारण्यात येते. या योजेअंतर्गत महिलेची १८ वर्षापर्यंत वयाची मुलगी व १२ वर्षापर्यंत वयाच्या मुलास वसतिगृहाच्या पाळणाघरामध्ये प्रवेश देण्यात येतो. त्याकरिता ५ टक्के पाळणा घराचे शुल्क आकारण्यात येते.

वुमन हेल्पलाइन

१८१ हेल्पलाइन क्रमांकावर महिलेस २४ तास ऑनलाईन सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. अन्यायग्रस्त पीडित महिलेने हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क केल्यास महिलेस आवश्यक सेवा तिच्या जिल्ह्यामध्ये उपलब्ध करून देण्यात येते.

महिलांना एसटी प्रवासात ५० टक्के सूट

गेल्या २५-३० वर्षात शहराबरोबर ग्रामीण भागातील महिलाही कर्तृत्वाच्या नवनव्या चौकटी निर्माण करत आहेत. परंपरागत समजांना आणि रूढींना छेद देत पुरूष प्रधान समाज व्यवस्थेत नारी शक्ती आपल्या कार्यकर्तृत्वाचे नव-नवे आयाम दाखवत आहे. नारी शक्तीच्या या धडाडीला, कल्पकतेला, जिद्दीला आणि मेहनतीला सरकारी पातळीवरून होणारे सहाय्य नेहमीच पूरक ठरते, असा अनुभव आहे. शहरी आणि ग्रामीण भागातील महिलांच्या गरजांचे स्वरूप आणि समस्यांचा परीघ अनेक अर्थाने भिन्न आहे. ग्रामीण, निमशहरी आणि शहरी भागातील सावित्रीच्या लेकी घराचा उंबरा ओलांडताना त्यांच्या समोर अनेकविध व्यावहारीक अडचणींचा डोंगर उभा असतो. ग्रामीण भागातील महिलांना अर्थार्जनासाठी बचत गट, नोकरी, व्यवसाय असे अनेक पर्याय उपलब्ध आहेत. त्यादृष्टीने एसटी प्रवासात ५० टक्के सूट देण्याचा निर्णय ग्रामीण भागातील महिलांसाठी अत्यंत महत्वाचा ठरला आहे. अनेक आव्हानांना तोंड देत तरुणी कमालीच्या जिद्दीने शिक्षणासाठी बाहेर पडतात. या लेकींना आणि तरुणींना एसटी प्रवासातील सवलतीचा मोठा फायदा मिळणार आहे.

मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात श्री. फडणवीस यांनी 'बेटी बचाओ बेटी पढाओ' अभियान आणखी गतिमान केले. 'बेटी बचाओ बेटी पढाओ'च्या धर्तीवर राज्यात 'माझी कन्या भाग्यश्री' योजना सुरू करण्यात आली. ७.५ लाख रुपये वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांसाठी ही योजना सुरू करण्यात आली. एका मुलीनंतर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यास त्या मुलीच्या नावे ५० हजार रुपये इतकी रक्कम मुदतठेवीद्वारे बँकेत गुंतवली जाते. मुलीच्या ६ व्या व १२ व्या वर्षी व्याजाची रक्कम काढून घेण्यास व १८ व्या वर्षी व्याजाची रक्कम मूळ गुंतवणूक रकमेसह काढून घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. दोन मुलींच्या जन्मानंतर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यास प्रत्येकी २५ हजार रुपये इतकी रक्कम मुलीच्या नावे बँकेत गुंतवणूक स्वरूपात ठेवली जाते. गरोदर आणि स्तनदा मातांची सकस आणि पोषक आहाराची गरज पुरवण्यासाठी फडणवीस सरकारने 'डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना' सुरु केली. या योजनेंतर्गत आदिवासी भागात गरोदर महिला आणि स्तनदा मातांना नियमित पोषण आहाराव्यतिरिक्त प्रतिदिन एक वेळेचे संपूर्ण जेवण (चौरस आहार) दिले जाऊ लागले.

आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविकांच्या मानधनात भरीव वाढ

आशा सेविकांना कार्यालयीन कामासाठी मोबाईल वितरण

नागपूर जिल्ह्यातील १३ तालुक्यातील प्रत्येकी एका आशा स्वयंसेविकेला प्रातिनिधिक स्वरूपात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मोबाईल वितरण करण्यात आले. प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण प्रतिष्ठान यांच्या सौजन्याने जिल्ह्यातील ग्रामीण भागात कार्यरत १ हजार ९१० आशा सेविकांना मोबाईल सुविधेच्या माध्यमातून आता अधिक सक्षम केले जात आहे. ग्रामीण भागातील आशा सेविका या आरोग्य विभागाचा कणा आहेत. आधुनिक युगात आता शासकीय कामकाजाशी निगडीत अनेक अहवाल, लाभार्थी नोंदणी हे ऑनलाईन पद्धतीने तथा प्लिकेशनच्या माध्यमातून करणे क्रमप्राप्त झाले आहे. या कामांमध्ये आशांना तत्परतेने काम करण्यास मदत होण्याच्या दृष्टीने त्यांना आधुनिक अँड्राईड मोबाईल देण्यात येत आहेत. प्रधानमंत्री मातृवंदन योजना, यू विनपोर्टल, आयुष्यमान भारत ई-कार्ड, आभा कार्ड तसेच अन्य ऑनलाईन कामे आता आशांना या मोबाईलच्या मदतीने करणे सुलभ होईल. यासाठी खनिज क्षेत्र कल्याण योजनेअंतर्गत सुमारे १ कोटी ९० लक्ष ९८ हजार ९० रुपये निधी आरोग्य व्यस्थापन सुविधेसाठी उपलब्ध करण्यात आला आहे.

या वर्गाची अनेक वर्षाची मागणी मान्य. आशा स्वयंसेविकांचे मानधन ३ हजार ५०० रूपयांवरून ५ हजार रूपये करण्याचा निर्णय श्री. फडणवीस यांनी २०२३-२४च्या अर्थसंकल्पात घेतला. अंगणवाडी सेविकांचे मानधन ८ हजार रूपयांवरून १० हजार रुपये करणे, मिनी अंगणवाडी सेविकांचे मानधन ६ हजार रूपयांवरून ७ हजार २०० रुपये करणे, अंगणवाडी मदतनिसांचे मानधन ४ हजार ४२५ रूपयांवरून ५ हजार ५०० रुपये करणे, असे अनेक निर्णय श्री. फडणवीस यांच्या महिला कल्याणकारी धोरणांची साक्ष देणारे ठरले आहेत. ग्रामीण भागातून शहरामध्ये नोकरीसाठी येणाऱ्या महिलांची संख्या गेल्या काही वर्षात मोठ्या प्रमाणात वाढू लागली आहे. या महिलांच्या सुरक्षितेचा प्रश्न आणि महिलांच्या अन्य समस्या लक्षात घेऊन नोकरदार महिलांसाठी शहरांमध्ये ५० वसतिगृहे केंद्र सरकारच्या मदतीने सुरू करण्याचा निर्णय श्री. फडणवीस यांनी घेतला आहे. ही वसतिगृहे शक्तीसदन या नावाने ओळखली जातील. वेगवेगळ्या कारणांमुळे अडचणीत सापडलेल्या महिलांसाठी, कौटुंबिक समस्यांनी त्रस्त असलेल्या महिलांसाठी तसेच लैंगिक शोषणापासून मुक्त केलेल्या महिलांकरीता स्वाधार आणि उज्ज्वला या दोन योजनांचे एकत्रिकरण करून केंद्र सरकारच्या मदतीने शक्तीसदन ही योजना राबवण्यात येणार आहे. या योजनेत पीडित महिलांना आश्रय, आरोग्य आणि समुदेशन या सेवा देण्यात येणार आहेत. ■

सदस्यता अभियान

● **विनोद तावडे, राष्ट्रीय सरचिटणीस**

भारतीय जनता पार्टीच्या सदस्यता अभियान २०२४ ला २ सप्टेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते प्रारंभ झाला. भारतीय जनता पार्टीची विचारसरणी सामान्य नागरिकांपर्यंत पोहचवण्यासाठी हे अभियान हाती घेण्यात आले आहे. या अभियानाचा पहिला टप्पा २ ते ५ सप्टेंबरपर्यंत असणार आहे. पहिल्या टप्प्यात प्राथमिक सदस्यता नोंदणी केली जाईल. प्राथमिक सदस्य नोंदणी दुसरा टप्पा १ ते १५ ऑक्टोबर या कालावधीत पार पडणार आहे. १६ ते ३१ ऑक्टोबर या काळात सक्रिय सदस्यांची नोंदणी केली जाणार आहे.

काश्मीर ते कन्याकुमारी, अंदमान-निकोबार ते कच्छ अशी देशभर सदस्य नोंदणी केली जाणार आहे. भारतीय जनता पार्टी हा जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष आहे. या अभियानात पक्षाची सदस्य संख्या आणखी वाढवून विविध समाज घटकांपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न या अभियानाद्वारे केला जाणार आहे. या माध्यमातून पक्षाची विचारधारा, सैध्दांतिक भूमिका सर्व सामान्य नागरिकांपर्यंत पोहचवण्याचे काम केले जाणार आहे. भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांसाठी देशहिताला सर्वोच्च प्राधान्य आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी नेहमीच सांगत असतात. पक्षाचे कार्यकर्ते हे देशाच्या, जनतेच्या सेवेसाठी आहेत, ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भूमिका आहे. याच हेतूने अडीअडचणीच्या, संकटाच्या काळात पक्ष कार्यकर्ते जनतेच्या मदतीला धावून जातात. देशहितासाठी सदैव दक्ष असलेल्या भारतीय जनता पार्टीची भूमिका सामान्य माणसाला कळावी तसेच सामन्य नागरिकांचा विकसित भारताच्या उभारणीतील सहभाग वाढावा, असा उद्देश सदस्यता अभियानामागे आहे.

पक्षाचा विस्तार बूथ पातळीपर्यंत व्यापक प्रमाणात व्हावा, समाजातील विविध समाज घटकांशी, जातींशी, समुदायाशी पक्षाचा संपर्क वाढावा, ही सदस्य अभियानाची प्रमुख उद्दिष्टे आहेत. या अभियानात जनतेपर्यंत पोहचण्यासाठी विविध माध्यमांचा वापर केला जाणार आहे. ८८००००२०२४ या दूरध्वनी क्रमांकावर मिस्ड कॉल दिल्यास भारतीय जनता पार्टीचे सदस्यत्व मिळणार आहे. क्यूआरकोड आणि नमो ॲपच्या माध्यमातूनही पक्षाचे सदस्यत्व घेता येईल. या अभियानासाठी राष्ट्रीय स्तरावर ९ जणांची समिती तयार करण्यात आली आहे. प्रदेश स्तरावर ४ किंवा ६ सदस्यांची समिती तसेच जिल्हा स्तरावर ३-४ सदस्यांची समिती या अभियानासाठी आपले योगदान देईल. या अभियानासाठी १७ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. १९ ते २१ ऑगस्ट या काळात प्रदेश स्तरावरील कार्यशाळा झाल्या. २२ ते २४ ऑगस्ट या काळात जिल्हा स्तरावरील तर २५ ते २७ ऑगस्ट या काळात मंडल स्तरावरील कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले होते. अभियानाचा आढावा घेण्यासाठी २१ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय समितीची तसेच प्रदेश स्तरावरील आढाव्यासाठी २२-२३ सप्टेंबर रोजी बैठकांचे आयोजन करण्यात आले आहे. या अभियानाच्या अंतिम टप्प्यात म्हणजे १ ते १० नोव्हेंबर या काळात प्राथमिक आणि सक्रिय सदस्यांचे रजिस्टर तयार केले जाणार आहे. विद्यमान केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे राष्ट्रीय अध्यक्ष असताना २०१४-१५ या काळात सुमारे ५-६ महिने सदस्यता अभियान पार पडले. त्या काळात सुमारे ११ कोटी जणांनी पक्षाचे सदस्यत्व घेतले होते. ६ जुलै ते २० ऑगस्ट २०१९ या काळातील सदस्यता अभियानात ७ कोटी नवे सदस्य झाले. याचा अर्थ २०१४-१९ या पाच वर्षाच्या काळात भाजपाचे १८ कोटी सदस्य झाले. यामुळेच भारतीय जनता पार्टी हा जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष ठरला आहे. १९८४ मध्ये भारतीय जनता पार्टीचे फक्त खासदार निवडून आले होते. तेव्हापासून सुरू झालेला संघर्षाचा प्रवास जगातील सर्वात मोठा पक्ष बनण्यापर्यंत पोहचला आहे. ■

शेतकऱ्यांना मोफत वीज, मागेल त्याला सौरपंप

उपमुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ऊर्जा मंत्री म्हणून कार्यकाळात खूप कमी वेळात ऊर्जा क्षेत्राचे परिवर्तन करणारी पावले उचलली गेली. त्याचप्रमाणे सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देणारीही अनेक कामे केली गेली.

शेतकऱ्यांना मोफत वीज

शेतकऱ्यांना सिंचनासाठी मोफत वीज मिळावी म्हणून महायुती सरकारने मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना जाहीर केली आहे. त्यासाठी सरकारने १४,७६० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. या योजनेचा लाभ ४४ लाख कृषी पंपधारक शेतकऱ्यांना होणार आहे. योजनेच्या अंमलबजावणीची जबाबदारी महावितरणकडे देण्यात आली आहे. या योजनेत शेतकऱ्यांचे कृषी पंपांचे दरमहा बिल राज्य सरकार भरणार आहे.

नवीन वीज कनेक्शन मोठ्या प्रमाणात

वीज ग्राहकांना विशेषतः घरगुती वीज ग्राहकांना नवीन कनेक्शन मिळताना होणारा विलंब ही सामान्य लोकांसाठी अत्यंत त्रासदायक बाब आहे. नव्या कनेक्शनसाठी अर्ज करायचा, पैसे भरायचे आणि अनेक दिवस वाट पहायची असा अनुभव आधी अनेक वीज ग्राहकांना येत असे. मात्र मा. देवेंद्र फडणवीस यांनी ऊर्जामंत्री म्हणून सूत्रे स्वीकारल्यानंतर वीज ग्राहकांना कमीत कमी वेळेत नवीन कनेक्शन मिळण्यासाठी पद्धतशीर प्रयत्न करण्यात आले व त्यामध्ये महावितरणला यश आले. राज्यात २०२२–२३ या आर्थिक वर्षात एकूण १० लाख ६९ हजार नवीन कनेक्शन देण्यात आली तर २०२३–२४ या आर्थिक वर्षात ही संख्या १२ लाख २९ हजारांवर गेली. १ एप्रिल २०२२ रोजी राज्यात १ लाख ७० हजार ग्राहक पैसे भरून कनेक्शनच्या प्रतीक्षेत होते. ही संख्या १ एप्रिल २०२४ रोजी केवळ ४८ हजारांवर आली. विशेष म्हणजे राज्यात १ लाख ३७ हजार घरगुती ग्राहकांना गेल्या दोन वर्षात अर्ज केल्यानंतर २४ तासात वीज कनेक्शन मिळाली. ग्राहकांना किती काळात नवीन वीज कनेक्शन

मिळाली पाहिजेत याची कालमर्यादा (एसओपी) विद्युत नियामक आयोगाने ठरवली आहे. घरगुती ग्राहकांना वीज कनेक्शन देण्याच्या बाबतीत कालमर्यादा पाळण्याचे प्रमाण २०२२-२३ साली ४० टक्के होते ते २०२४-२५ मध्ये ८२ टक्क्यांवर पोहोचले आहे.

शेतकऱ्यांचा पेड पेंडिंगचा प्रश्न सोडविला

शेतकरी कृषी पंपासाठी वीज कनेक्शन मिळण्याच्या हेतुने पैसे भरतो पण ते कनेक्शन प्रलंबित राहते या समस्येला पेड पेंडिंग म्हणतात. ही समस्या विशेषतः विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांना अधिक जाणवत होती. कनेक्शनसाठी अर्ज केल्यानंतर शेतकऱ्यांना वर्षानुवर्षे वाट पहावी लागत होती. मा. देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या २०१४ ते २०१९ या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात शेतकऱ्यांचा पेड पेंडिंगचा प्रश्न सोडविण्यासाठी प्रभावी पावले टाकली. मध्यंतरी महाविकास आघाडीच्या काळात ही समस्या तशीच राहिली. पुन्हा जून २०२२ मध्ये सत्तेची सूत्रे स्वीकारल्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांचा पेड पेंडिंगचा प्रश्न सोडविण्यासाठी प्रभावी कामगिरी केली. गेल्या सव्वा दोन वर्षांच्या अल्पावधीत राज्यात २ लाख ९५ कृषी पंपांना वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत. २०२२ च्या तुलनेत आता पेड पेंडिंगचे प्रमाण खूपच घटले आहे. शेतकऱ्यांना वीज कनेक्शन देण्यासाठी महावितरणकडे आग्रह धरतानाच मा. देवेंद्र फडणवीस यांनी या कामसाठी राज्य सरकारकडून १८४९ कोटी रुपये उपलब्ध करून दिले म्हणून यश मिळाले. गेल्या दहा वर्षांमध्ये कोणत्याही एका वर्षात दिलेल्या कृषी वीज कनेक्शनपेक्षा अधिक म्हणजे १ लाख ७० हजार कनेक्शन २०२२-२३ या एकाच आर्थिक वर्षात देण्यात आली. नव्याने सरकार स्थापन झाल्यावर मा. देवेंद्र फडणवीस यांनी या प्रश्नाला प्राधान्य दिल्याचा हा परिणाम होता. एकीकडे शेतकऱ्यांना पारंपरिक वीज कनेक्शन देण्यात आलेली गती आणि दुसरीकडे मागेल त्या शेतकऱ्याला सौर कृषी पंप ही योजना यामुळे राज्यात लवकरच पेड पेंडिंगची समस्या इतिहासजमा झालेली दिसेल.

ट्रान्सफॉर्मर दुरुस्तीला गती

ट्रान्सफॉर्मर नादुरुस्त झाल्यामुळे वीज पुरवठा खंडित झाल्याची गंभीर समस्या राज्याला जाणवत होती. ग्रामीण भागात अनेक दिवस ट्रान्सफॉर्मर दुरुस्ती न झाल्याने शेतीचा वीज पुरवठा आणि गावकऱ्यांना दैनंदिन वीज पुरवठा या दोन्हीवर विपरित परिणाम होत होता. त्यामुळे असंतोषही निर्माण झाला होता. मा. उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी ऊर्जामंत्रीपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर या प्रश्नाला प्राधान्य दिले. त्यांनी ट्रान्सफॉर्मर दुरुस्तीसाठी, नवे ट्रान्सफॉर्मर खरेदी तसेच ऑईल खरेदीसाठी ५०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला व याबाबतीत महावितरणला तातडीने कारवाई करण्याचे निर्देशही दिले. दि. २९ नोव्हेंबर २०२२ रोजी राज्यात ६०९८ नादुरुस्त ट्रान्सफॉर्मर बदलणे बाकी होते. त्यानंतर महावितरणने हाती घेतलेल्या मोहिमेमुळे आता हे प्रमाण दिवसाला ७० ते ८० वर आले आहे. नादुरुस्त ट्रान्सफॉर्मर बदलण्यासाठी पंधरा ते वीस दिवस लागत असत तो कालावधी आता ४८ तासांपर्यंत कमी झाला आहे. नादुरुस्त ट्रान्सफॉर्मरची माहिती देणे नागरिकांना सोपे जावे म्हणून महावितरणने आपल्या मोबाईल ॲपमध्ये विशेष सुविधाही उपलब्ध करून दिली.

ऊर्जा चॅट बॉट

अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वीज ग्राहकांना लाभ व्हावा म्हणून महावितरणने आर्टिफिशिअल इंटिलिजन्सचा वापर करून ऊर्जा चॅट बॉट विकसित केला आहे. राज्यातील वीज ग्राहकांना बिल भरण्यापासून विविध कामांसाठी हे चॅट बॉट मदत करते. महावितरणच्या वेबसाईटला हे चॅट बॉट जोडलेले असून ग्राहक मोठ्या प्रमाणात त्याचा लाभ घेत आहेत.

डिजिटल पेमेंटला चालना

वीज ग्राहकांसाठी बिल भरणा केंद्रात जाऊन रांगेत उभे राहून बिल भरणे त्रासदायक असते. त्यामुळे त्यांचा वेळ जातो आणि महत्त्वाच्या कामात अडचण येते. यावर उपाय डिजिटल पेमेंट आहे. ग्राहक घर बसल्या कधीही आपल्या मोबाईल फोनवरून किंवा कॉम्प्युटर वापरून विजेची बिले भरू शकतात. गेल्या दोन वर्षात महावितरणने डिजिटल पेमेंटला चालना देण्यासाठी सवलतीसह विविध उपाय केले. त्याचा परिणाम म्हणून २०२१-२२ या आर्थिक वर्षाअखेर ऑनलाईन बिले भरणाऱ्या वीज ग्राहकांचे प्रमाण ५९ टक्के होते ते २०२३-२४ या आर्थिक वर्षाअखेर ते ७० टक्के झाले. याच कालावधीत एकूण भरलेल्या बिलांच्या रकमेत ऑनलाईन बिलांचे प्रमाण ७७ टक्क्यांवरून ८७ टक्क्यांवर पोहोलचे.

उद्योगांसाठी स्वागत सेल

राज्यात रोजगारनिर्मितीसाठी मोठ्या प्रमाणात उद्योगधंदे चालण्याची गरज आहे. सर्व प्रकारच्या उद्योगांची वीज ही मुलभूत गरज आहे. राज्यातील वाढती गुंतवणूक व नवीन उद्योग सुरू होण्याचे प्रमाण ध्यानात घेता महावितरणने जानेवारी २०२४ मध्ये जिल्हा मुख्यालयांच्या ठिकाणी स्वागत सेल नावाचा कक्ष स्थापन केला आहे व त्याची जबाबदारी अधिकाऱ्यांना दिली आहे. उद्योगांना वीज कनेक्शनसाठी अर्ज आल्यानंतर त्याचा पाठपुरावा करणे, स्वतःहून ग्राहकांशी संपर्क साधून त्यांच्या समस्या दूर करणे अशी जबाबदारी अधिकाऱ्यांना दिली आहे.

मागेल त्याला सौर कृषी पंप

शेतकऱ्यांना हक्काचे आणि कायमस्वरुपी सिंचनाचे साधन उपलब्ध व्हावे म्हणून महायुती सरकारतर्फे मागेल त्याला सौर कृषी पंप ही योजना लागू केली आहे. या योजनेत राज्यात ९ लाख सौर कृषी पंप बसविण्यात येणार आहेत. ज्यांना यापूर्वी कृषी पंपासाठी पारंपरिक वीज कनेक्शन मिळालेले नाही किंवा ज्यांना यापूर्वी सौर पंप मिळालेला नाही असे सर्व शेतकरी यासाठी पात्र आहेत. केंद्र सरकार व राज्य सरकार ९० टक्के सबसिडी देत असल्याने शेतकऱ्यांना केवळ दहा टक्के रक्कम भरून वीजनिर्मितीसाठी सौर पॅनेल्स, पंप असा पूर्ण संच मिळतो. अनुसूचित जाती जमातीच्या शेतकऱ्यांनी पाच टक्के रक्कम भरायची आहे.

छतावर सोलर पॅनल

महिना तीनशे युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या वीज ग्राहकांना मोफत वीज मिळावी आणि वीज विकून उत्पन्नही मिळवता यावे यासाठी मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना लागू केली आहे. यामध्ये तीन किलोवॅटपर्यंतच्या छतावरील सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पांसाठी ७८ हजार रुपयांपर्यंत अनुदान मिळते. राज्यात महावितरणतर्फे या योजनेची अंमलबजावणी चालू आहे.



मनोऱ्यासाठी भरपाईत वाढ

मनोरा अथवा वाहिनी उभारणीपोटी वाजवी दराने मोबदला मिळावा अशी शेतकऱ्यांची मागणी असते. महायुती सरकारने शेतकऱ्यांना मिळणाऱ्या नुकसान भरपाईमध्ये वाढ केली आहे. मनोऱ्याने व्याप्त जमिनीच्या क्षेत्रफळाचे संबंधित भागातील शासनाच्या रेडी रेकनरच्या आधारे किंवा मागील तीन वर्षात झालेल्या जमिनीच्या खरेदी-विक्री व्यवहाराच्या आधारे निश्चित होणारा सरासरी दर यापैकी जो अधिक असेल त्या दराने मोबदला देण्याचे निर्देश दिले आहेत. या खेरीज अन्य सुधारणांमुळे जमीन मालकांना नुकसान भरपाईपोटी पूर्वीपेक्षा अधिक मोबदला मिळतो.

(महावितरणचे स्वतंत्र संचालक विश्वास पाठक यांच्या 'परिवर्तनाचा नायक' या पुस्तिकेतून साभार.)

जन-धन योजनेची 10 वर्षे

गेल्या एका दशकात जर कोणत्या योजनेने देशाच्या विकासाची विचारसरणी आणि दिशा बदलून क्रांती घडवली असेल तर ती आहे एका दशकापूर्वी २८ ऑगस्ट २०१४ रोजी सुरु झालेली प्रधानमंत्री जनधन योजना. लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून १५ ऑगस्टला आपल्या पहिल्या भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले होते, बंधू-भगिनींनो, स्वातंत्र्याच्या या पर्वावर मी एक योजना राबवण्याचा संकल्प करण्यासाठी तुमच्याकडे आलो आहे- 'प्रधानमंत्री जनधन योजना' देशाची आर्थिक साधनसंपत्ती गरिबांच्या उपयोगी पडावी, याची सुरुवात इथूनच होत आहे. या वर्षी २८ ऑगस्टला प्रधानमंत्री जनधन योजनेला एक दशक पूर्ण झाले आहे. चला जाणून घेऊया आर्थिक समावेशनातील महत्त्वाचा दुवा जनधन योजना कशा प्रकारे बनली आहे जन-केंद्रित आर्थिक उपक्रमांची आधारशिळा...

आत्मसंतुष्टी, आत्मसन्मान आणि आत्मिक गौरवाची अनुभूती घेऊन प्रधानमंत्री जनधन योजनेच्या लाभार्थ्यांच्या अशा यशोगाथा केवळ गेल्या १० वर्षातच सामाजिक-आर्थिक स्थितीमधील परिवर्तनकारी दशकाच्या साक्षीदार बनल्या आहेत. कोणत्याही समाजातील क्रांतिकारक बदलाची वाहक सुदृढ अर्थव्यवस्था असते आणि त्या अर्थव्यवस्थेच्या आर्थिक सुरक्षेचा पहिला पाया बँक खाते असते. प्रत्येक देशाच्या विकासाच्या वाटचालीत अशा संधी येतात, ज्यावेळी तो अभिमानाने सांगतो की आजच्या दिवशी आम्ही

छत्तीसगडमधील जशपूर जिल्ह्याच्या रहिवासी लीलाबाई पोर्ते यांच्या कुटुंबात सहा सदस्य होते. शेतमजुरी करून या कुटुंबाचा चरितार्थ चालत होता. ही २०१५ ची गोष्ट आहे, करमीटिकरा गावापासून बँक ७ किलोमीटर इतक्या दूर अंतरावर होती, कोणतेही बँक खाते नव्हते. एका बँक मित्राने गावात येऊन आपल्या लहानशा यंत्राने खाती उघडली. नंतर जीवन ज्योती विम्याचा अर्ज भरला. पतीचा त्याचवर्षी उष्माघाताने मृत्यू झाला. त्यामुळे त्या असहाय्य झाल्या होत्या. मानसिक आणि आर्थिकदृष्ट्या त्रासल्या होत्या. बँक मित्र अधिकाऱ्यांना याची माहिती देण्यात आली त्यावेळी त्यांनी सामाजिक सुरक्षा योजने अंतर्गत विम्याची माहिती दिली. घरी येऊन कागदपत्रांसहित अर्ज भरून कार्यालयाकडे पाठवला ज्यामुळे २ लाख रुपये खात्यात जमा झाले. संकटाच्या प्रसंगात आर्थिक मदत, जगण्याचा आधार गवसला.

मध्य प्रदेशच्या पनिहार गावाचे रहिवासी गजेंद्र सिंह यांनी ऑगस्ट २०१४ मध्ये प्रधानमंत्री जनधन योजनेत खाते उघडले. बँक खाते उघडण्यापूर्वी त्यांना बँक खाते किंवा बँकिंग व्यवस्थेची माहिती नव्हती. ते अल्पभूधारक शेतकरी आहेत. सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या बरई शाखेत खाते उघडल्यानंतर गजेंद्र सिंह यांनी त्याचा वापर सुरू केला आणि आजूबाजूच्या गावात देखील या खात्याच्या 'फायद्यांबाबत जागरुकता निर्माण केली. आर्थिक समावेशनाबाबत त्यांचे ज्ञान देखील वाढले आहे.

एनसीआरच्या फरिदाबादमधील ओद्योगिक वसाहतीत मोठ्या संख्येने स्थलांतरित कामगार राहतात. सुमारे एक दशकापूर्वी बहुतेक औद्योगिक युनिट्स आपल्या कामगारांना रोख वेतन द्यायचे. अशा वेळी प्रशासनाने यांना बँकिंग प्रवाहात आणण्याचा निर्णय घेतला. स्टेट बँक ऑफ इंडियाने येथे खाती उघडण्यास सुरुवात केली. सुमारे ५५ हजार खाती उघडण्यात आली, पासबुक आणि रुपे कार्ड दिली. बहुतांश खात्यांना आधारशी जोडण्यात आले आणि स्वयंचलित यंत्रे बसवण्यात आली.

सर्वांनी नवा इतिहास रचला आहे. असे काही क्षण जीवनात प्राप्त होतात, ज्यांची सुरुवात २०१४ मध्ये झाली होती. जनधन योजनेचे दशक आज हेच सांगत आहे कारण २०११ सालापर्यंत देशातील जवळपास २५ कोटी कुटुंबांपैकी सुमारे १४ कोटी कुटुंबांपर्यंतच बँकिंग सुविधा उपलब्ध होती. एका दशकात या योजनेने ५२ कोटींपेक्षा जास्त नव्या लोकांना जोडले आहे. बँकिंग सेवांपासून वंचित लोकांना सेवा उपलब्ध करण्यासाठी, असुरक्षितांना सुरक्षित आणि बिगर वित्त पोषितांना वित्त पोषण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने २८ ऑगस्ट २०१४ रोजी प्रधानमंत्री जनधन योजना सुरू झाली होती. लोककेंद्रित आर्थिक उपक्रमांची आधारशिळा बनलेल्या या योजनेत प्रत्येक घरातील एक पाऊल पुढे टाकत प्रत्येक प्रौढ व्यक्तीचे खाते असेल हे सुनिश्चित झाले आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी असो किंवा इतर जागतिक संस्था असोत, सर्वांनीच या योजनेची प्रशंसा करताना म्हटले आहे की जनधनने बँक खाती आणि आर्थिक सेवांची पोहोच व्यापक बनवली आहे. या योजनेच्या यशामुळेच सुशासनातून स्वावलंबन नव्या भारताचा संस्कार बनून विकसित भारताचा मार्ग खुला करत आहे. एक लहानसा प्रयत्न–जनधन खाते ज्यावेळी गरिबाला मिळाले त्यावेळी त्याचा स्वाभिमान जागृत झाला आणि लाखो–कोट्यवधी रुपयांच्या बचतीत गरीब देखील पुढे आला आहे. गरिबीच्या दुष्टचक्रातून मुक्तीसाठी १५ ऑगस्ट २०१४ रोजी ज्या योजनेची घोषणा केली, तिला १५ दिवसांच्या आत लागू देखील करण्यात आले. आपल्याकडे शास्त्रांमध्ये असे सांगितले गेले आहे की सुखस्य मूलम् धर्म, धर्मस्य मूलम् अर्थ, अर्थस्य मूलम् राज्यम्. म्हणजेच सुखाच्या मुळात धर्म म्हणजे आचरण, मात्र धर्माच्या मूळात आर्थिक स्थैर्य आहे, आर्थिक स्थैर्याच्या मुळात राज्याचे दायित्व जु ही राज्याची जबाबदारी आहे. हे चाणक्याच्याही आधीच्या आपल्या पूर्वजांनी सांगितलेले आहे. यासाठी राज्य आपले दायित्व निभावण्याचा प्रयत्न करत आहे ज्यामुळे सामान्य व्यक्तीची देखील आता आर्थिक स्थिती सामान्य असली तर तो सुख आणि समाधानाच्या स्थितीपर्यंत पोहोचेल. ये गरिबांच्या जीवनात सूर्योदयाचा प्रारंभ झाला.

सुनियोजित पद्धतीने तयार झाले सुरक्षा चक्र

कोणत्याही सामान्य नागरिकाच्या जीवनात तीन गोष्टी

महत्त्वाच्या आहेत– स्वावलंबन, स्वश्रेय आणि स्वाभिमान. महात्मा गांधी यांनी सत्य, अहिंसा, सत्याग्रहाबरोबरच स्वावलंबनाच्या विचारांनी देशाला नवा मार्ग दाखवला होता. त्याच मार्गावर चालून स्वच्छ, समृद्ध आणि सशक्त नव्या भारताची निर्मिती होत आहे. जिथे लोकहिताच्या योजनांना शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचवून लोकसहभागाच्या माध्यमातून सुरक्षित–स्वाभिमानी आणि स्वावलंबी भारताची अशी व्यवस्था तयार होत आहे जी लोकांचे जीवन सुकर करत आहे आणि जीवनमानाचा दर्जा उंचावत आहे. २०१४ मध्ये जेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केंद्र सरकारची धुरा सांभाळली, त्यावेळी देशाच्या व्यवस्थेचे त्यांनी अतिशय बारकाईने अध्ययन केले आणि सुशासनाच्या आपल्या पूर्वीच्या अनुभवाचा वापर करून दीर्घकालीन विचाराने देशाच्या शेवटच्या पायरीवर असलेल्या व्यक्तीला सक्षम बनवण्यासाठी आणि त्या व्यक्तीसाठी आर्थिक सुरक्षेचे चक्र तयार करण्यासाठी सुनियोजित पद्धतीने पाऊल पुढे टाकले आहे. यामध्ये प्रधानमंत्री जनधन योजना सर्व उपक्रमांचा पाया बनली आहे. बँकांना गरिबांच्या दारापर्यंत पाठवण्याचा आगळावेगळा उपक्रम सुरू केला. देशाच्या जनतेचा पैसा, त्यांच्या हक्काचे पैसे त्यांना मिळाले पाहिजेत. या दिशेने एका व्यापक विचारासह केंद्र सरकारने जनधन खाते, आधार आणि मोबाईलची अशी त्रिशक्ती बनवली की गरिबांच्या पैशाची लूटमार बंद झाली. आता घर बांधण्यासाठी पैसे असोत किंबा गॅस अनुदानाचे, मनरेगाचे पैसे असोत किंबा शेतकरी सन्मान निधीचे असोत, सर्व थेट खात्यात पोहोचू लागले. म्हणजेच सर्वांना लाभ, थेट लाभ, कोणताही भेदभाव नाही. मग त्यांना मजबूत करण्यासाठी स्टॅंडअप, स्टार्टअप आणि मुद्रा सारख्या योजनांसोबत जोडण्याचे तंत्र तयार केले. म्हणजेच आर्थिक–सामाजिक सुरक्षेचे चक्र प्रदान करताना उद्योजकतेच्या दिशेने घेऊन जाणारी सर्व योजनांचा पाया बनली– प्रधानमंत्री जनधन योजना. जनधन बँक खात्यांच्या यशाविषयी आज देशवासी परिचित आहेत. ज्यावेळी ही योजना आली होती, तेव्हा काही तज्ञांनी सांगितले होते की ही खाती उघडणे साधनसंपत्तीची नासाडी आहे, यामध्ये गरीब एक पैसा देखील भरणार नाहीत. मात्र पंतप्रधान मोदी सांगतात की केवळ गोष्ट पैशाची नव्हती. ही गोष्ट होती मानसिक अडसर तोडण्याची, मानसिकता बदलण्याची. हे लोक गरिबांच्या अभिमानाला, त्यांच्या स्वाभिमानाला कधी समजू शकले नाहीत, जो जनधन योजनेने त्या गरिबांमध्ये निर्माण केला. त्यांना तर बँकांच्या दारावर जायची देखील हिंमत होत नसायची, ते घाबरत असायचे. त्यांच्यासाठी बँक खाते असणे देखील श्रीमंतीचे लक्षण होते. जेव्हा त्यांनी पाहिले की बँका स्वतः त्यांच्या दारापर्यंत येत आहेत, तेव्हा त्यांच्या मनात एक विश्वास जागृत झाला, स्वाभिमान जागा झाला, त्यांच्या मनात एक नवे बीज अंकुरले. आज ते मोठ्या अभिमानाने आपल्या खिशातून रुपे कार्ड काढतात. तर एक काळ असा होता की रुपे कार्ड केवळ श्रीमंतांसाठी त्यांच्या स्टेटसचा विषय होता. मात्र, केंद्र सरकारने जनधन खात्यांच्या माध्यमातून त्या मानसिक विचारसरणीचा भंग केला आहे. जनधनच्या बीजाने वटवृक्ष बनून अशी कित्येक फळे दिली आहेत.

‘डीबीटी’ने बदलली दिशा

देशात प्रदीर्घ काळ गरिबी हटाओच्या घोषणा सुरू राहिल्या. पण या घोषणांनतरही गरिबी हटली नाही. याचे सर्वात मोठे कारण होते की गरिबांच्या नावावर योजना तर तयार व्हायच्या पण त्यांचा लाभ त्यांच्या खऱ्या लाभार्थ्यांना मिळत नव्हता. गरिबांच्या हक्काचे पैसे मध्येच मध्यस्थांकडून लुटले जायचे. म्हणजे पूर्वी नीयत, नीती आणि निष्ठा पिंजऱ्यात होती पण आता नीयत स्वच्छ आहे, नीती गरिबांना सशक्त करण्याची आहे आणि निष्ठा देशाविषयी आहे. म्हणूनच प्रधानमंत्री मोदी यांनी गॅरंटी दिली की

वंचित, कष्टकरी वर्गाला या योजनेमुळे विकासाच्या मुख्य प्रवाहात आणले आहे.

सरकारी लाभ आता थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहोचतील. लाभार्थ्यांच्या मार्गातील मध्यस्थांना हटवण्याचे काम केले. तंत्रज्ञानाच्या मदतीने १० वर्षात भ्रष्टाचाराचा प्रत्येक मार्ग बंद करण्यासाठी केंद्र सरकारने शक्य होतील तितके प्रयत्न केले केले. जनधन-आधार-मोबाईल यांच्या त्रिशक्तीमुळे कोट्यवधी बनावट लाभार्थ्यांना गरिबांचे अधिकार हिरावून घेण्यापासून थांबवण्यात आले. देशात जवळपास १० कोटी असे बनावट लाभार्थी होते, ज्यांचा कधी जन्मच झाला नव्हता आणि तरीही त्यांना सरकारी मदत जात होती. हे पैसे कोणत्यातरी गरिबाचे, आदिवासी, मागास आणि दलितांचे होते. या १० वर्षात ३० लाख कोटी रुपये थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) द्वारे थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात पोहोचले आहेत. आज डिजिटल प्रशासनाच्या उत्तम पायाभूत सुविधा भारतात आहेत. जनधन-मोबाईल आणि आधार म्हणजे जेएएमच्या त्रिशक्तीचा देशाच्या गरीब आणि मध्यम वर्गाला सर्वाधिक लाभ झाला आहे. यातून ज्या सुविधा प्राप्त झाल्या आहेत, जी पारदर्शकता आली आहे त्यातून देशातल्या कोट्यवधी कुटुंबाच्या पैशाची बचत होत आहे.

जेव्हा पंतप्रधान जनधन योजना सुरु करण्यात आली तेव्हा अनेक लोकांना वाटत होते की काय होईल, कसे होईल? मात्र आज अनुभवाला येत आहे की गरिबांसाठी एकामागोमाग एक योजना येत राहिल्या. हा आर्थिक-सामाजिक सबलीकरणाचा पाया होता ज्याचा आणखी विस्तार केला जात आहे. या देशामध्ये काही लोकांना सरकारी पेन्शन मिळते,सुमारे ३५ लाख लोकांना आधी किती पेन्शन मिळत होती? कोणाला सात रुपये, कोणाला २० रुपये, कोणाला सव्वाशे रुपये, कोणाला अडीचशे रुपये. त्यातही पेन्शन घ्यायला जाण्यासाठी मैलोनमैल प्रवास करावा लागत असे मात्र आता थेट लाभ हस्तांतरणामुळे हे निश्चित झाले आहे की ज्या व्यक्तीला पेन्शन मिळते ती एक हजार रुपयांपेक्षा कमी मिळणार नाही जेणेकरून गरीबाला सन्मानाने जगता येईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, 'आपण कल्पना करू शकता, १९६९ मध्ये जेव्हा बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले, स्वातंत्र्यानंतरच्या ६८ वर्षापर्यंत ६८ टक्के लोकांचा अर्थव्यवस्थेच्या या भागाशी संबंध नव्हता. जेव्हा एखादी व्यक्ती बँकेत खाते उघडते तेव्हा अर्थव्यवस्थेचा जो मुख्य प्रवाह आहे, त्या प्रवाहाशी जोडले जाण्याचे ते पहिले पाऊल ठरते.

'जेव्हा दशकांपूर्वी देशात बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले, त्यानंतरही २०१४ पर्यंत अशी स्थिती होती की देशात ४०-५० कोटी गरीब असे होते, ज्यांचे बँक खातेही नव्हते.म्हणजेच निम्मा देश बँकिंग व्यवस्थेच्या बाहेर होता. भ्रष्टाचाऱ्यांनी, देशाची संपत्ती लुटण्यासाठी आणखी एक पद्धत आणली होती, जी दशकांपासून चालू होती. ती म्हणजे सरकारी योजनांच्या लाभार्थ्यांची लुट. रेशन असेल, घर असेल, स्कॉलरशिप असेल, पेन्शन असेल अशा अनेक सरकारी योजनांमध्ये खऱ्या लाभार्थ्याला आपण फसवले गेल्याची भावना येत असे. तरीही याला मुद्याचे स्वरूप आले नाही. अशामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनधन योजना, एक चळवळ म्हणून घेतली. सुमारे ५२ कोटीहून अधिक लोकांना बँकिंग व्यवस्थेशी जोडले. डिजिटल इंडिया आणि भ्रष्टाचार विरोधी प्रयत्नांमध्ये हेच काम सर्वात मोठे माध्यम ठरले. इतकेच नव्हे तर एक काळ असाही होता की गरीबाकडे बँकेला हमी देण्यासाठी काही नव्हते. २०१४ पर्यंत ज्यांच्याकडे बँकेचे एकही खाते नव्हते, जर बँकेत खातेच नसेल तर त्यांना बँकांकडून कर्ज कसे मिळेल? मात्र जनधन खाते उघडल्यानंतर ते आधारशी संलग्न करण्यात आले, जास्तीत जास्त खाती मोबाईल क्रमांकाद्वारो जोडली जावीत यासाठी प्रयत्न करण्यात आले. आता योजना जनधनखात्याशी जोडल्या गेल्या आहेत. आता अशी स्थिती आहे की, सरकारच्या

सव्वा चारशेहून जास्त योजनांचे पैसे थेट लाभार्थ्यांच्या खात्यात हस्तांतरित होत आहेत. जनधन योजनेच्या याच खात्यांमध्ये आज पीएम-स्वनिधीचा पैसा फेरीवाल्यांना कर्जाच्या रुपाने मिळत आहे.

दशकांपूर्वीचा दृष्टीकोन विरुद्ध नव भारताचा दृष्टीकोन

भारताची बळकट बँकिंग व्यवस्था आणि बँकेचा प्रत्येक कर्मचारी, त्यांचे काम, गेल्या १० वर्षात सरकारच्या दृष्टीकोनाला अनुरूप राहिले आहे, हा सर्वांसाठी अभिमानाचा विषय आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेच्या योजनेचा दृष्टीकोन आपल्याला गरिबीतून मुक्त व्हायचे असेल तर वित्तीय भेदाभेदापासूनही मुक्त व्हायला हवे. प्रत्येक व्यक्ती वित्तीय क्षेत्राशी जोडायला हवी. गरीब-वंचित बँकिंग व्यवस्थेशी जोडले जावेत, सावकारी पाशातून त्याची मुक्तता व्हावी, बँकांनी सुलभतेने कर्ज द्यावे हा वित्तीय दृष्टीकोन ठेवून समवेशकतेच्या जगातल्या सर्वात मोठ्या उपक्रमांपेकी एक असलेली जनधन सुरु करण्यात आली. ग्राहकाने एखाद्या खात्यात २ वर्षापेक्षा जास्त काळ कोणताही व्यवहार केला नाही तर ते खाते निष्क्रिय मानले पाहिजे असे आरबीआय म्हणते. विविध उपक्रमांमुळे जनधन निष्क्रिय खात्यांची टक्केवारी मार्च २०१७ मध्ये ४०% होती, ती आता कमी होऊन सुमारे २० % राहिली आहे. महिला जनधन खातेधारकांची संख्या मार्च २०१५ मध्ये ७.५ कोटीवरून वाढून मार्च २०२४ मध्ये २८.९ कोटी झाली म्हणजे या नऊ वर्षात महिला खात्यांमध्ये सुमारे २१.४० कोटीची वाढ झाली. जेव्हा जनधन योजना सुरू झाली तेव्हा जुन्या विचारसरणीचे लोक विचारत की गरीबाकडे तर पैसाच नाही, बँक खाते उघडून तो काय करेल? बँकावरचे ओझे वाढेल, बँकांचे कर्मचारी कसे काम करतील. निराशेचा सुर लावण्यात आला होता मात्र बँकांच्या कर्मचाऱ्यांनी सुनिश्चित केले की गरिबांचे जनधन खाते उघडले जावे, यासाठी त्यांनी अहोरात्र काम केले. बँक कर्मचारी झोपड्यांमधून जात होते, लोकांची बँक खाती उघडून देत होते. आज देशात ५२ कोटीपेक्षा जास्त जनधन बँक खाती उघडण्यात आली आहेत तर त्यामागे या बँक कर्मचाऱ्यांचे परिश्रम आहेत. बँक कर्मचाऱ्यांच्याच परिश्रमाचे हे फळ आहे की ज्यामुळे कोरोनाकाळासारख्या शतकातल्या सर्वात मोठ्या आपत्ती काळातही सरकार कोट्यवधी महिलांच्या बँक खात्यात थेट ३० हजार कोटी

रुपयांपेक्षा जास्त रक्कम हस्तांतरित करू शकले. आज देशात ५२ कोटीहून अधिक जनधन खात्यांमध्येही ५५ टक्क्यापेक्षा अधिक खाती महिलांच्या नावावर आहेत. या वित्तीय समावेशनाचा प्रभाव कृषी आणि मत्स्य यासारख्या क्षेत्रातही दिसून येत आहे. आज ७ कोटीहून अधिक शेतकरी, मत्स्य पालक आणि पशुपालकांकडे किसान क्रेडिट कार्ड आहे. यातून देशाच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठे बळ मिळाले आहे. सहकार क्षेत्रातही गेल्या १० वर्षात मोठे बळ लाभले आहे. सहकार क्षेत्रात, सहकारी बँकांची अतिशय मोठी भूमिका असते. भारताचे यूपीआय आज जागतिक ओळख असलेला मंच ठरला आहे. यावर दरमहा १२०० कोटी रुपयांपेक्षा जास्त व्यवहार होत आहेत. या एका दशकात नवी बँकिंग व्यवस्था, एक नवी अर्थव्यवस्था आणि नव्या मुद्रा देवाण-घेवाणीच्या अनुभवात प्रवेश केला आहे. मात्र गेल्या १० वर्षात जे काम झाले आहे ते म्हणजे केवळ एक झलक आहे. येत्या १० वर्षात याचा आणखी विस्तार करण्याचा सरकारचा दृष्टिकोन आहे. देशाला रोकड विरहित अर्थव्यवस्थेच्या दिशेने पुढे नेत वित्तीय समावेशकतेसाठीचे जोमदार प्रयत्न अधिक उत्तम करायचे आहेत. जनधन बँक खाती, गरिबांमधले मानसिकतेचे अडथळे तोडण्यासाठी आणि त्यांचा आत्मसन्मान पुन्हा मजबूत करण्याचे माध्यम ठरली आहेत.

जनधनचा पाया, त्रिस्तरीय परभाव ठरला आधार

आज देशात जे परिवर्तन घडत आहे त्याची दिशा काय आहे, हे मापण्याची एक पद्धत आहे ती म्हणजे अर्थव्यवस्थेचा विकास आणि विस्ताराची गती. भारताला एक ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था होण्यासाठी सुमारे ६० वर्षे लागली. २०१४ पर्यंत भारताची अर्थव्यवस्था दोन ट्रिलियन

डॉलरपर्यंत पोहोचू शकली. म्हणजे सात दशकात २ ट्रिलियन डॉलर्सची अर्थ व्यवस्था. मात्र आज १० वर्षात भारत सुमारे साडेतीन ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था असणारा देश झाला आहे. गेल्या १० वर्षात १० व्या क्रमांकाच्या अर्थव्यवस्थेवरून ५ व्या क्रमांकापर्यंत देशाने झेप घेतली आहे. कोणत्याही धोरणाचा पहिला आणि स्वाभाविक परिणाम आहे. पहिला परिणाम काय झाला, हेच धोरणाचे पहिले लक्ष्य असते. हे अल्प काळात दिसून येते मात्र प्रत्येक धोरणाचा द्वितीय आणि तृतीय स्तरावरचाही परिणाम असतो जो सखोल आणि दूरगामी असतो.

जनधन योजनेमध्ये उपलब्ध सुविधा

● बँक सुविधा खाते नसलेल्या व्यक्तीसाठी एक आधारभूत बचत बँक जमा (बीएसबीडी) खाते उघडळले जाते.

● कोणत्याही बँक शाखा किंवा व्यवसाय प्रतिनिधी (बीसी) द्वारा संचालित बँकिंग आउटलेटमध्ये खाते उघडता येऊ शकते.

● जनधन खाते उघडण्यासाठी कोणतेही शुल्क नाही.

● जनधन खातेधारकाला २ लाख रुपयांच्या (२८-८-२०१८ पूर्वी उघडलेल्या खात्यांसाठी १ लाख रुपये) अपघात विमा कवचामह एक रुपे डेबिट कार्ड मोफत दिले जाते.

● पात्र जनधन खातेधारक १० हजार रुपयांपर्यंत ओव्हरड्राफ्ट सुविधेचा लाभ घेऊ शकतो.

● सरकारी योजनांतर्गत थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी)सुविधा जनधन खात्यात प्राप्त करता येते.

बदलत्या भारताचे चित्र

● लोकांना मुख्य आर्थिक प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने १९६९ या वर्षी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. मात्र या उद्देशाची पूर्तता झाली नाही. स्वातंत्र्याच्या ६८ वर्षानंतर म्हणजे २०१४ पर्यंत देशाच्या ६८ टक्के लोकसंख्येला बॅंकिंग सुविधांचा लाभ मिळाला नव्हता. श्रीमंतांना सुलभपणे कर्ज मिळत असे मात्र गरिबाला सावकाराकडून कर्ज घ्यावे लागत असे.

● ऑगस्ट २०१४ मध्ये प्रत्येक कुटुंबाला बँकेशी जोडण्याचा उद्देशाने योजनेची सुरूवात करण्यात आली.

● १४ ऑगस्ट २०१८मध्ये या योजनेचा विस्तार करत प्रत्येक ज्येष्ठाला बँकेशी जोडण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले.

● वित्तीय समावेशकतेच्या उपक्रमा अंतर्गत सरकारने आदिवासी आणि दुर्गम भागातल्या गावांसाहित सर्व गावांना ५ किलोमीटरच्या आत बँकिंग सेवा सुनिश्चित करण्याचे काम केले आहे.

तो येण्यासाठी वेळ लागतो. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर परवाना राजवाले जे आर्थिक धोरण स्वीकारले गेले त्यामध्ये सरकारच नियंत्रक बनले होते. स्पर्धात्मकता नष्ट करण्यात आली आणि खाजगी उद्योग आणि सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना वाव दिला गेला नाही. इतर देशांच्या तुलनेत आपण मागे पडू लागलो हा याचा पहिला नकारात्मक परिणाम झाला. भारताचा वस्तू उपभोग दर जगाच्या तुलनेत कमी राहिला हा या धोरणांचा द्वितीय स्तरावरचा परिणाम झाला. यामुळे उत्पादन आणि गुंतवणुकीची संधी देशाने गमावली. तिसरा परिणाम म्हणजे देशात नवनिर्मितीचे वातावरण होऊ शकले नाही. मात्र २०१४ नंतर केंद्र सरकारने जी धोरणे आखली त्यामध्ये केवळ तात्पुरता लाभ लक्षात घेतला गेला नाही तर द्वितीय आणि तृतीय स्तरावरच्या परिणामांनाही प्राधान्य देण्यात आले.

आज जनधन योजनेमुळे थेट बॅक खात्यामध्ये लाभार्थ्यांना योजनेचा निधी पोहोचवणे, पक्की घरकुले देणे, उज्वला योजनेअंतर्गत मोफत गॅस सिलेंडर देणेशक्य होत आहे. त्याचबरोबर मुद्रा योजनेतून विनातारण कर्जाची सुविधा, पीएम स्वामित्व योजना असो अथवा इतर सामाजिक व्यवहारांशी संबंधित योजना असो, अशा सर्व गोष्टींमुळे गरीबांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली आहे. या योजनांमुळे लाभार्थ्यांना केवळ तत्कालिन लाभ मिळाला आहे असे नाही, तर त्यांच्यामध्ये एक

● **योजनेअंतर्गत ५३.१४ कोटींहून अधिक लाभार्थ्यांची बँक खाती.**

● **या खात्यांत एकूण २लाख ३१हजार २३६ कोटी रु. जमा.**

● **जनधन खाती मार्च २०१५ मध्ये १५.६७ कोटी एवढी होती . ही खाती ३.६ पटीने वाढून १४ ऑगस्ट २४ रोजी ५३.१४ कोटींवर पोहचली आहेत.**

● **सुमारे ५५.६% जन-धन खातेधारक महिला आणि सुमारे ६६.६% जन धन खाती ग्रामीण आणि निम शहरी भागात.**

● **जनधन खातेधारकांना ३६.१४ कोटी रुपे कार्ड जारी.**

आत्मसन्मान, आत्मसंतोष आणि आत्मगौरवाची भावना निर्माण होण्यास मदत झाली आहे. या योजनांचा प्रभाव तीन स्तरावर झाला आहे. मग यामध्ये थेट लाभ हस्तांतर असो, बीज, पाणी आणि शौचालय यांच्यासारख्या सुविधा देणाऱ्या योजना गरीब लोकांपर्यंत पोहोचवण्याचे काम असो, यासाठी अगदी पायाभूत स्तरावर काम झाल्यामुळे क्रांती घडून आली आहे. या योजनांमुळे देशातील गरीबातील गरीब व्यक्तींच्या मनामध्येही सन्मान आणि सुरक्षेची भावना निर्माण झाली आहे. देशामध्ये गरीब व्यक्तींना पहिल्यांदाच सामाजिक सुरक्षितता मिळाली आहे आणि आत्मसन्मानही मिळाला आहे. गरीब लोक म्हणजे, अनेक दशकांपर्यंत देशावर असलेले ओझे आहे, त्यांच्यामुळे देशाचा विकास खुंटला आहे, असे समजले जात होते, तीच मंडळी आज देशाच्या विकासाला गती देत आहेत. ज्यावेळी सरकार या योजनांचा प्रारंभ करीत होते, त्यावेळी काही लोकांनी त्या योजनांची खूप खिल्ली उडवली होती. परंतु आज या योजनांनी भारताच्या विकासाला वेग दिला आहे. या योजना विकसित भारताच्या निर्माणाचा आधार बनल्या आहेत. गेल्या १० वर्षांमध्ये गरीब, दलित, वंचित, मागास, आदिवासी, सामान्य वर्ग, मध्यम वर्ग, अशा समाजातील प्रत्येक घटकाच्या जीवनामध्ये परिवर्तन घडून आल्याचा अनुभव सर्वांना येत आहे. आज देशामध्ये एक विशिष्ट दृष्टिकोन समोर ठेवून त्यानुसार 'मिशन मोड'वर काम केले जात आहे. त्यामुळे सत्तेच्या विचाराचे परिवर्तन सेवेच्या विचारामध्ये झालेले आहे. तुष्टीकरण नाही, तर संतुष्टीकरण हा आधार बनविण्यात आला आहे. या दृष्टिकोनामुळे देशातील गरीब आणि मध्यम वर्गासाठी एका सुरक्षा कवचाची निर्मिती झाली आहे. या सुरक्षा कवचामुळे देशातील गरीबाला आणखी गरीब होण्यापासून वाचवले आहे. आजचा नवीन भारत निर्भय आहे. निर्भिक आहे आणि निर्णायक आहे. आज सरकार १४० कोटी भारतीयांच्या पुरूषार्थामुळे देश, पूर्ण विश्वासाने मार्गक्रमण करीत आहे. आता नवीन भारत आपले सामर्थ्य, आपली साधने, आपली संसाधने, यांच्यावर भरवसा ठेवून पुढे वाटचाल करीत आहे. आपल्यामध्ये पायाभूत गोष्टींविषयी असलेला मकुवतपणा दूर करून, येणारी सर्व आव्हाने कशा पद्धतीने कमी होतील, यासाठी प्रयत्न केला जात आहे. यशाची अनेक शिखरे गाठण्याचे ध्येय आधी ठेवावे लागत होते. तरीही, वास्तविक हे कार्य केले पाहिजे, अशी वृत्तीच आधी नव्हती की पैशांचा अभावही नव्हता. मात्र एक ध्येय समोर ठेवून, त्याच्या पूर्तीसाठी काम केले जात नव्हते, उत्तर, पर्याय कमी नव्हते मात्र संवेदनशीलतेचा अभाव होता. सामर्थ्याची कमतरता नव्हती मात्र कार्य संस्कृतीचा अभाव होता.

आजमितीला ५२ कोटींपेक्षाही जास्त गरीब जनतेला निश्चित स्वरूपाने बॅकिंग कार्यप्रणालीमध्ये समाविष्ट करून घेणारी जनधन योजना म्हणजे भारताच्या आर्थिक पायाभूत सुविधेचे उत्तम उदाहरण बनली आहे. स्वातंत्र्याचा हा अमृतकाळ म्हणजे, सर्व प्रयत्नांचा कालखंड बनला आहे. ज्यावेळी प्रत्येक भारतीयाची शक्ती यामागे लागेल, प्रत्येक भारतीयाचे परिश्रम यामागे असतील तर विकसित भारताचे स्वप्न लवकरात लवकर पूर्ण होईल. प्रामाणिकपणाने वाटचाल करणाऱ्या देशवासियांची संख्या आता वाढत चालली आहे आणि हीच भव्य भारताची एक हमी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी असे म्हणतात की, माझे देशवासी हेच भव्य भारताची हमी आहेत.' ■

आर्थिक उन्नतीचे ‘जनधन’

● व्ही. अनंत नागेश्वरन

अर्थकारणाच्या परिघाबाहेरील भारतीयांना या आर्थिक वर्तुळात आणण्यासाठी २०१४ मध्ये रालोआ सरकारने ‘प्रधानमंत्री जनधन योजना’ सुरू केली. या योजनेने अनेकांना आपली आर्थिक ओळख मिळवून दिली. डिजिटल व्यवहारांना चालना दिली. कर्ज मिळविण्याचा औपचारिक मार्ग खुला केला. या योजनेच्या गेल्या दहा वर्षांतील परिणतीविषयी...

सत्ता, पद, प्रभाव किंवा भौतिक संपत्ती यांपैकी कोणत्याही गोष्टीची जेव्हा आपण आकांक्षा बाळगतो आणि त्यासाठी कठोर परिश्रम घेतो, तेव्हा त्यातील यशाने आपल्याला काही काळ आनंद होतो. मग मन पुन्हा नव्याचा विचार करते. जे साध्य झाले आहे तो मापदंड ठरतो आणि त्यापेक्षा पुढे जाण्याची आकांक्षा जागृत होऊन मन त्याचा ध्यास घेऊ लागते. बहुतेकांच्या बाबतीत हे घडते. आम्ही सार्वजनिक धोरणांच्या बाबतीतही असाच दृष्टिकोन स्वीकारला आहे. काही धोरणे, करावयाच्या कृती याबाबत आम्ही आग्रही आहोत. प्रदीर्घ काळ चालत आलेल्या समस्येवर सरकार जेव्हा तोडगा काढते, तेव्हा मापदंड अधिकच उंचावतात. तथ्याधारित चिंतन केल्यास आणि केलेल्या कामाची योग्य दखल घेतली गेल्यास ती पुढील यशासाठी मार्गदर्शक ठरू शकते. अशीच एक योजना म्हणजे ‘प्रधानमंत्री जनधन योजना’. ही यशस्वी योजना आपला दहावा वर्धापन दिन साजरा करत आहे.

कोट्यवधी भारतीय प्रदीर्घ काळापासून अर्थव्यवस्थेच्या परिघाबाहेरच राहिले होते आणि त्याविषयी केवळ खेद व्यक्त करण्यापलीकडे कोणतीही कृती केली जात नव्हती. २०१४ मध्ये मात्र, तत्कालीन रालोआ सरकारने या परिघाबाहेरील भारतीयांना औपचारिक आर्थव्यवस्थेत समाविष्ट करून घेण्याचे आव्हानात्मक कार्य हाती घेतले. ‘प्रधानमंत्री जनधन योजना’ सुरू करण्यात आली आणि तिला नेत्रदीपक यश लाभले. १४ ऑगस्ट २०२४ पर्यंत, या योजनेअंतर्गत एकूण ५३ कोटी १३ लाख लाभार्थी असून त्यांच्या खात्यांत दोन लाख ३१ हजर कोटी रुपये जमा आहेत. यापैकी सुमारे ३० कोटी लाभार्थी महिला आहेत. ‘द डिझाइन ऑफ डिजिटल फायनान्शिअल इन्फ्रास्ट्रक्चर : लेसन्स फ्रॉम इंडिया’ या २०१९मधील शोधनिबंधात बँक फॉर इंटरनॅशनल सेटलमेंट्सच्या संशोधकांनी म्हटले आहे, ‘‘आर्थिक समावेशन आणि औपचारिक ओळख या दोन्हींचे २००८ मधील निम्न स्तर लक्षात घेता एका दशकापूर्वी भारतासमोरील आव्हानांची तीव्रता खूप मोठी होती. बँक खात्यांची विदा आणि तिचा प्रति व्यक्ती सकल राष्ट्रीय उत्पादनाशी असलेला संबंध याच्या वर दिलेल्या आकडेवारीचा विचार करता, वृद्धीच्या पारंपरिक पद्धतींवरच अवलंबून राहिले असता ८० टक्के प्रौढ भारतीयांचे स्वतःचे बँक खाते असावे, हे लक्ष्य गाठण्यास अंदाजे ४७ वर्षे लागली असती.’’

आणखी एक शोधनिबंध– ‘बँकिंग द अनबँकड: व्हॉट डू २८० मिलिअन न्यू बँक अकाउंट्स रिव्हिल अबाऊट फायनान्शिअल ॲक्सेस? सप्टेंबर २०२३– असे दर्शवतो की ‘पीएमजेडीवाय’ खात्यांनी आर्थिक बचत सुरक्षित ठेवण्यास हातभार लावला आहे. कारण ज्या भागा चोऱ्या होण्याचे प्रमाण अधिक आहे, अशा भागांत पीएमजेडीवाय खाती उघडणाऱ्यांची संख्या लक्षणीय आहे. या योजनेमुळे

सामान्यपणे उच्च व्याजदर आकारणाऱ्या अनौपचारिक स्रोतांकडून कर्ज घेण्याच्या प्रमाणातही घट झाली आहे.

जिथे एखाद्या धोरणावर झटपट ताशेरे ओढून मोकळे होण्याची प्रवृत्ती हा अपवाद नसून नियमच झाला आहे, अशा जगात, प्रधानमंत्री जनधन योजनेअंतर्गत असलेली बहुतेक खाती शून्य-शिल्लक होती, असे टीकाकारांनी निदर्शनास आणले आहे. या खात्यांमध्ये दोन लाख ३१ हजार कोटी रुपयांची एकत्रित ठेव शिल्लक आहे. कोविडच्या जागतिक साथीच्या काळात या खात्यांची उपयुक्तता अमूल्य असल्याचे सिद्ध झाले. केंद्र सरकारने या खात्यांमध्ये थेट लाभ हस्तांतरित केले. गेल्या तीन आर्थिक वर्षांमध्ये, अंदाजे आठ लाख एक हजार कोटी रुपये थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यांमध्ये हस्तांतरित करण्यात आले. डिजिटल पेमेंटसाठीच्या पायाभूत सुविधांत उत्क्रांती होत असतानाच कोविड साथीने कळस गाठला होता, त्या काळात या खात्यांमुळे विना-स्पर्श आर्थिक व्यवहार करणे सुलभ झाले. 'मुक्त बँकिंगमुळे वित्तपुरवठा वाढतो का?' हे ऑगस्ट २०२४मधील संशोधन असे दर्शविते की प्रधानमंत्री जनधन योजनेने मुक्त बँकिंग- अर्थात ग्राहकांच्या परवानगीने त्यांची माहिती कोणत्याही वित्तीय संस्थेला पुरविणे शक्य झाले आहे. अधिक नेमकेपणाने सांगायचे तर प्रधानमंत्री जनधन खाती अधिक असणाऱ्या भागांमध्ये 'फिनटेक'च्या नेतृत्वाखालील पतवृद्धी अधिक पटने झाली आणि ज्या भागांत स्वस्त आणि चांगली इंटरनेट संपर्क जोडणी उपलब्ध आहे, तिथे अधिक प्रभावी परिणाम दिसून आले आहेत. एकापेक्षा अधिक खात्यांमधून डेटा संकलित करून तो एकाच ठिकाणी एकत्रित करणे हे मुक्त बँकिंग सुविधेतून साध्य झालेले फलित आहे. यामुळे सर्वसामान्य जनता वित्तीय उत्पादने आणि सेवांचा लाभ घेण्यास सक्षम होत आहे. प्रधानमंत्री जनधन योजनेने महिलांना त्यांची स्वत:ची बँक खाती असणे आणि त्या खात्यात त्यांचे स्वत:चे पैसे असणे यासाठी सक्षम केले आहे. या आर्थिक स्वातंत्र्याचे मूल्यमापन करणे अवघड असले तरी ते अतिशय महत्त्वाचे आहे. भारतीय महिलांचा नैसर्गिक कल बचत करण्याकडे अधिक आहे आणि या सवयीमुळे कालांतराने कुटुंबाच्या वित्तीय सुरक्षेला अधिक मजबुती प्राप्त होऊ शकते. याची परिणती म्हणून राष्ट्राचा बचतीचा दरदेखील वाढतो. त्याहीपुढे जाऊन यामुळे देशात महिला उद्योजकतेला अधिक चालना मिळू शकते. नवउद्यामींना प्रोत्साहन देणारी केंद्र सरकारची महत्त्वाकांक्षी 'स्टार्ट अप इंडिया' ही योजना किंवा अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती तसेच महिलांमधील उद्योजकतेला पाठबळ देणारी 'स्टॅन्ड अप इंडिया' या योजनांच्या माध्यमातून आलेल्या उद्योजकतेच्या लाटेमध्ये महिलांचा सहभाग अतिशय उत्साहवर्धक आहे. पीएम मुद्रा योजनेअंतर्गत सुमारे ६८ टक्के कर्ज महिला उद्योजकांना मंजूर करण्यात आली आहेत आणि मे २०२४ पर्यंत स्टँड-अप इंडियाअंतर्गत लाभार्थ्यांपैकी ७७.७ टक्के महिला आहेत. ३० जुलै २०२४ पर्यंत, देशात उद्यम आणि यूएपीवर नोंदणीकृत महिलांच्या मालकीच्या लघु आणि मध्यम उद्योगांची संख्या एक कोटी ८५ लाखांपेक्षा जास्त आहे. प्रधानमंत्री जनधन खात्यांमुळे महिलांचे सक्षमीकरण झाले आहे. स्वयंरोजगार/ उद्योजकतेमधील त्यांचे कार्यकर्तृत्व उजळून निघत आहे. या साऱ्यावर औपचारिक पद्धतीने संशोधन होणे गरजेचे आहे. यासंदर्भात केल्या जाणाऱ्या प्रतिवादाचा विचार करण्याच्या आव्हानाकडे परत येऊया. प्रधानमंत्री जनधन योजनेने खातेधारकांना दिलेल्या लाभांचा विचार केल्यास, ही योजना अस्तित्वात नसती तर सद्य:स्थिती कशी असती, याची कल्पना करणे कठीण नाही. प्रधानमंत्री जनधन योजना सुरू करण्याचा दूरदर्शी निर्णय घेतला नसता आणि अल्पावधीत त्याची यशस्वी अंमलबजावणी झाली नसती तर गेल्या दशकभरात भारताच्या विकासाच्या यशोगाथा तुलनेने कमी झाल्या असत्या.

(लेखक हे केंद्र सरकारचे मुख्य आर्थिक सल्लागार आहेत.)

(सौजन्य: दै.लोकसत्ता)

अराजक निर्माण करण्याचे विरोधकांचे प्रयत्न

बदलापूर येथे एका चिमुकलीबाबत घडलेल्या घटनेमुळे जनमानस ढवळून निघणे स्वाभाविक आहे. माणुसकीला काळीमा फासणाऱ्या अशा विकृत प्रकारांची संख्या का वाढू लागली आहे, हा स्वतंत्र लेखाचा आणि संशोधनाचा विषय आहे. या घटनेचा निषेध करण्यासाठी बदलापूरमध्ये आंदोलन झाले. सुमारे ९ तास रेल्वे वाहतूक बंद पाडली गेली.

पोलिसांनी अत्यंत संयमाने परिस्थिती हाताळल्यामुळे तेथे अनर्थ घडला नाही. या आंदोलनात सहभागी झालेली मंडळी कोण होती आणि त्यांचे उद्देश काय होते, या विषयी वेगवेगळी माहिती प्रसिद्ध होत आहे. अशा घटनांचे निमित्त करून हिंसक घटना घडवून आणण्याचा काही शक्तींचा प्रयत्न असल्याचे असंख्य पुरावे गेल्या १० वर्षात मिळाले आहेत. बदलापूर घटनेच्या निषेधार्थ उद्धव ठाकरे आणि काँग्रेसने महाराष्ट्र बंदची हाक दिली होती. न्यायालयाच्या दट्ट्यामुळे उद्धव ठाकरे आणि काँग्रेस नेत्यांना मनात इच्छा नसताना बंदचे आवाहन मागे घ्यावे लागले. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात अशांतता निर्माण करून राजकीय स्वार्थाच्या पोळ्या भाजण्याचा अधम प्रयत्न सध्या सुरू आहे. गेल्या काही महिन्यातील घटनांचा बारकाईने मागोवा घेतला तर उबाठा, काँग्रेस आणि शरद पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांच्याकडून अराजकता माजवण्याचे प्रयत्न किती पद्धतशीरपणे चालू आहेत, याची

असंख्य उदाहरणे मिळतील. लोकसभा निवडणुकीत संविधान बदलाच्या खोट्या बातम्या पसरवून, सीएएचा बाबुलबुआ दाखवून मुस्लीम समाजात भयगंड निर्माण केला गेला. त्याचे राजकीय फायदे महाविकास आघाडीला ३२ जागांच्या रूपाने मिळाले. विधानसभा निवडणुकीत या खोट्या बातम्यांचा वापर पुन्हा करता येणे अशक्य आहे, हे लक्षात आल्याने विविध समाजघटकांना भडकावून राज्यात अशांतता निर्माण करण्याचा प्रयत्न कुटील पद्धतीने चालू असल्याचे दिसून आले आहे.

बांगलादेशमध्ये हिंदुंवर झालेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ राज्यात काही ठिकाणी निषेध मोर्चे निघाले. या मोर्चांवर नाशिक आणि जळगाव येथे दगडफेक केली गेली. विविध हिंदू संघटना आणि पोलिसांनी संयम ठेवल्याने या दोन्ही शहरांमध्ये काही वेडेवाकडे घडले नाही. हिंदू संघटनांनी आक्रमक होऊन पुढे यावे आणि त्यातून हिंसाचाराला निमित्त मिळावे, असा साधा सरळ हेतू ठेवून हिंदू संघटनांच्या मोर्चांवर दगडफेक केली गेली. महंत रामगिरी यांनी इस्लाम धर्माविषयी काढलेल्या उद्‌गारांमुळे त्यांच्या विरोधात पोलिसांमध्ये तक्रारी दाखल केल्या गेल्या. त्या मागचा हेतू राज्यातील धार्मिक सलोखा संपुष्टात यावा, असाच होता. मराठा आरक्षणाच्या विषयावर तोडगा काढण्यासाठी महायुती सरकारने अलिकडेच सर्वपक्षीय बैठकीचे आयोजन केले होते. उबाठा, काँग्रेस आणि शरद पवार या बैठकीला उपस्थित राहणे टाळले. या विषयावरून उबाठा, काँग्रेस आणि शरद पवार गटाचे नेते महायुती सरकारविरूद्ध असंतोष निर्माण करण्याचा कसा प्रयत्न करीत आहेत, हे गेल्या वर्ष दीड वर्षात महाराष्ट्राने पाहिले आहे. या विषयावरून महायुती आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर सातत्याने आगपाखड करणाऱ्या मनोज जरांगे यांनी आजवर उबाठा आणि शरद पवारांविरोधात चकार शब्दही उच्चारलेला नाही. मराठा समाजाला अन्य मागासवर्गीय समाजाच्या हक्काच्या आरक्षणातून वाटा देण्याऐवजी स्वतंत्र आरक्षण द्यावे, अशी भूमिका भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वाने सातत्याने मांडली आहे. मराठा समाजाला ओबीसींच्या कोट्यातून आरक्षण देण्यास तुमची मान्यता आहे का, असा प्रश्न अनेकवेळा विचारूनही शरद पवार, उद्धव ठाकरे यांनी या प्रश्नाचे उत्तर देणे टाळले आहे. मराठा समाजाला स्वतंत्र आरक्षण देण्याऐवजी ओबीसींच्या कोट्यातूनच द्या, अशी मागणी करण्याची सूचना आंदोलकांना शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांनीच दिली असावी, असे मानण्याजोगा भरपूर परिस्थितीजन्य पुरावा उपलब्ध झाला आहे. या मागचा कार्यकारण भाव मराठा आणि ओबीसी समाजाला समोरासमोर उभे करून राज्याची सामाजिक वीण उसवणे हाच आहे. मराठा आणि ओबीसी परस्परांविरुद्ध आणून राजकीय स्वार्थ साधण्याच्या गणितामुळे राज्यातील सामाजिक सलोखा आपण कायमस्वरूपी संपवून टाकू, याचे भानही उबाठा, शरद पवार आणि काँग्रेस नेत्यांना राहिले नाही. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी दोन अग्निवीरांच्या मृत्यूबाबत खोटी माहिती पसरवून युवकांमध्ये केंद्र सरकार आणि अग्निवीर योजनेबाबत गैरसमज निर्माण करण्याचे केलेले हेतूपूर्वक प्रयत्न अलिकडच्या काळातीलच आहेत. देशातील वातावरण सतत धगधगत राहिले पाहिजे, त्यातून असंतोष निर्माण व्हावा, त्याचे रूपांतर अशांततेत व्हावे, असा एक कलमी कार्यक्रम घेऊन उबाठा, काँग्रेस आणि शरद पवार गट सध्या कार्यरत असल्याचे ठिकठिकाणी दिसते. विरोधकांचा सत्ताधारी पक्षाला विरोध असणे अभिप्रेतच आहे.

निखळ लोकशाहीच्या तत्वांना अनुसरून विरोधकांचा विरोध नेहमीच स्वागतार्ह आहे. मात्र राजकारणापोटी देशातील शांतता, धार्मिक सलोखा आणि सामाजिक ऐक्य धोक्यात आणण्याचा खेळ देशाला किती महागात पडू शकतो, याची फिकीर विरोधकांना नसावी, हे दुर्दैवी आहे. सामान्य भारतीय जनता सूज्ञ आहे, ती या प्रयत्नांना थारा देणार नाही, अशी खात्री आहे. ■

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांसाठी केंद्राप्रमाणे सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना केंद्राप्रमाणे सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. ही योजना मार्च २०२४ पासून अंमलात आणली जाईल. या निर्णयाचा राज्यातील लाखो कर्मचाऱ्यांना फायदा होणार आहे. राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीतील गुंतवणूक विषयी जोखीम राज्य शासनाने स्विकारावी हे समितीच्या शिफारशीतले तत्व मान्य करुन राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीतील नियत वयोमानानुसार निवृत्त होणारे कर्मचारी यांनी जर प्रस्तावित सुधारित राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेचा विकल्प दिल्यास त्यांना त्यांच्या शेवटच्या वेतनाच्या ५०% इतके निवृत्तिवेतन व त्यावरील महागाई वाढ तसेच निवृत्तिवेतनाच्या ६०% इतके कुटुंब निवृत्तिवेतन व त्यावरील महागाई वाढ मिळेल. वरीलप्रमाणे राज्य शासनाची सुधारित राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना ही राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली लागू असलेल्या कर्मचाऱ्यांना १ मार्च, २०२४ पासून लागू करण्यात येणार आहे. राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली लागू असलेल्या व १ मार्च, २०२४ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या तसेच निवृत्तीपश्चात वार्षिकी विकत घेतलेल्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकापासून ते २९ फेब्रुवारी, २०२४ पर्यंतच्या कालावधीत संबंधित सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीअंतर्गत अनुज्ञेय असलेल्या वार्षिकी (Annuity) मधीलच लाभ लागू राहतील व १ मार्च, २०२४ पासून सुधारित राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेचा विकल्प देणाऱ्या निवृत्तिवेतनधारकास या योजनेंतर्गत निवृत्तिवेतन देण्यात येईल. या योजनेतर्गत सेवा कालावधीची गणना ही सभासदाने प्रत्यक्ष भरलेल्या अंशदानाशी (वर्गणीशी) निगडीत असेल. ज्या कालावधीसाठी सभासदाने अंशदान भरलेले नसेल तर वरील प्रयोजनार्थ तो कालावधी सेवा कालावधी म्हणून गणण्यात येणार नाही. कर्मचाऱ्यांची ज्या कालावधीचे अंशदान त्यांच्या वेतनातून कपात करण्यात आलेली नाही असे अंशदान भविष्यात कर्मचाऱ्याने व्याजासह भरल्यास तो कालावधी वरील प्रयोजनार्थ सेवा कालावधी म्हणून गणण्यात येईल. सुधारित राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना लागू झाल्यापासून राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीअंतर्गत जमा झालेल्या संचित निधीमधून कोणत्याही प्रकारची यापूर्वी वा नंतर काढलेली रक्कम १०% व्याजासह भरणे आवश्यक राहील अन्यथा त्यांना निवृत्तिवेतन त्या प्रमाणात अनुज्ञेय ठरेल.

यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही पार पाडल्यावर तसेच ही योजना राज्य शासकीय कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त अन्य पात्र कर्मचाऱ्यांना लागू असल्याने राज्य शासकीय कर्मचाऱ्यांसमवेत अन्य कर्मचाऱ्यांसंदर्भाने सर्व यंत्रणा सुसज्ज झाल्यावर जे कर्मचारी राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीमधून १ मार्च २०२४ पूर्वी व नंतर सेवानिवृत्त झाले आहेत किंवा होणार आहेत अशा कर्मचाऱ्यांकडून राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली अंतर्गत किंवा सुधारित राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना अंतर्गत लाभ मिळण्याबाबत आवश्यक तो विकल्प घेण्यात येईल. मात्र या कर्मचाऱ्यांनी राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीमधील त्यांचे अंशदान अद्यावत भरणा केलेली असणे आवश्यक राहील. तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्याला त्याच्या संचित निधीमधून प्राप्त झालेल्या ६०% परताव्याची रक्कम शासनाकडे भरणा करणे अनिवार्य असणार आहे. त्याचबरोबर Annuity Service Provider कडून प्राप्त होणारे ४०% वार्षिकीमधून प्राप्त होणारा परतावा शासनाकडे प्राप्त झाल्यानंतर या योजनेंतर्गत निवृत्तिवेतन अनुज्ञेय ठरेल. त्यासंदर्भाने या योजनेच्या अटी व शर्ती विहित करुन त्यासंदर्भातील कार्यपध्दती PFRD च्या मान्यतेच्या अधिन राहून स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येईल. मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषित्तर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेली अनुदानित अशासकीय महाविद्यालये आणि कृषि विद्यापीठामधील कर्मचारी जे राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीचे सभासद आहेत व उपरोक्तप्रमाणे अटींची पूर्तता करीत असतील अशा कर्मचाऱ्यांसंदर्भात वरील निर्णय योग्य त्या फेरफारांसह लागू राहतील. तसेच हा निर्णय जिल्हा परिषदेतील कर्मचाऱ्यांनाही लागू राहील. ■

महायुती सरकारने घडवले एक लाख मराठा उद्योजक

> महायुती सरकारने अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाला १ लाख मराठा उद्योजक घडविण्याचा टप्पा पूर्ण केला आहे. महामंडळाच्या माध्यमातून लाभार्थींची संख्या १ लाख १४ वर पोहचली आहे. आतापर्यंत विविध बँकांच्या माध्यमातून ८३२० कोटी रुपयांची कर्ज वितरीत केली असून ८३२ कोटी रुपयांचा व्याजपरतावा देण्यात आला आहे. १ लाख मराठा उद्योजक संकल्पपूर्तीनिमित्त, स्व.अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ व सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. मार्फत आयोजित लाभार्थी मेळाव्यामध्ये उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते.

राज्यातील मराठा समाजातील नागरिकांना स्वतःच्या व्यवसाय करता यावा, यासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाची स्थापना केली आहे. २०१८ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महामंडळाची पुनर्रचना करून महामंडळाला निधी उपलब्ध करून नरेंद्र पाटील यांच्यावर अध्यक्षपदाची जबाबदारी सोपविली. तेव्हापासून विविध बँकांच्या माध्यमातून व्यवसाय उभारण्यासाठी कर्ज उपलब्ध करून देण्यास सुरुवात झाली. कर्जावरील व्याजाची रक्कम महामंडळाच्या माध्यमातून बँकांना देण्यात येते. या माध्यमातून १ लाख उद्योजक घडविण्याचे उद्दीष्ट निश्चित केले होते. आता लाभार्थ्यांची संख्या १ लाख १४ झाली आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यापर्यंत दुग्ध व्यवसायापासून ट्रान्सपोर्ट व इतर व्यवसाय उभारण्यासाठी समूह व वैयक्तिक कर्ज उपलब्ध करून देण्यात येते. महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी महामंडळाने एक लाखचा उद्योजक निर्मितीचा संकल्प टप्पा पूर्ण केल्याने आपण भावूक झाल्याचे सांगून महामंडळाच्या पुनर्रचनेमुळे मराठा नवद्योजकांना न्याय देण्याचे काम होत असल्याचे सांगितले. महामंडळाचे कार्य सर्वदूर पोहचविण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात फिरुन आपण संवाद साधला आहे. मराठा समाजात व्यावसायीक निर्माण करण्यात महामंडळाचा वाटा मोलाचा आहे, असे सांगून

नोकरी देणारे हात मराठा समाजात तयार व्हावेत यासाठी प्रयत्न

नोकरी मागणारे नाहीत तर नोकरी देणारे हात मराठा समाजामध्ये तयार झाले पाहिजे आणि याचदृष्टीने आम्ही स्व.अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाची पुनर्रचना केली. स्व. अण्णासाहेब पाटील यांचे सुपुत्र, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील आणि श्रीमंत छत्रपती आ. शिवेंद्रराजे भोसले यांच्या संकल्पनेतून मराठा समाजात १ लाख उद्योजक तयार झाले. महामंडळाच्या माध्यमातून ८.५ हजार कोटींचे कर्ज मराठा तरूणांना मिळाले. त्याचे व्याज महामंडळ भरते आहे. सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेने या कर्जवाटपात महत्त्वाची भूमिका बजावली. 'सारथी'सारखी संस्था आपण तयार केली, गरीब शेतकऱ्याचा मुलगा कोचिंग क्लासेसची फी भरु शकत नाही, सारथीच्या माध्यमातून त्यांना हे दालन उपलब्ध करुन दिले. 'सारथी' होती म्हणून आम्ही घडलो असे म्हणणारे आयएएस, डीवायएसपी पाहतो तेव्हा मनापासून आनंद वाटतो. खासगी महाविद्यालयामध्ये ५०७ कोर्सेसमध्ये आमच्या मराठा तरुण-तरुणींची फी भरण्याचा निर्णय राज्य सरकारने केला, त्यासाठी १६०० कोटी द्यायला सुरुवात केली. मुलींकरता मोफत शिक्षण देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. श्रीमंत छत्रपती आ.शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी मागणी केल्याप्रमाणे सातारा येथे मराठा समाजातील तरुणांसाठी वसतिगृह उभे करुन दिले जाईल. मराठा समाजाला न्याय मिळाला पाहिजे म्हणूनच आमच्या सरकारने १०% आरक्षण दिले. आम्ही ते टिकवून ठेवणारच आहोत. १७ हजार पदांसाठी पोलीस भरती झाली त्यामध्ये १० टक्क्यांपेक्षा जास्त मराठा तरुणांना जागा मिळाली आहे. इतिहास शिव्याशापांना लक्षात ठेवत नाही, कर्तृत्वाला लक्षात ठेवतो. जेव्हा योजनांचे मूल्यमापन होईल तेव्हा मराठा समाजासाठी केलेले हे कार्य लक्षात ठेवले जाईल. मराठा समाज शतकानुशतकत्के समाजातील अठरा पगड जाती जमातींना सोबत घेऊन चाललेला आहे. या समाजाचे आर्थिक, सामाजिक उन्नतीचे सर्व प्रश्न मार्गी लावण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. कोणत्याही परिस्थितीत मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिले ही शासनाची भूमिका आहे. विकासाच्या सर्व प्रश्नांबाबत चर्चेतून मार्ग काढण्यात येत आहे. कायद्याच्या चौकटीत टिकणारे कल्याणकारी निर्णय घेण्यात येत आहेत. मराठा समाजातील तरुणांनी नोकरी देणारे व्हावे यासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाची पुनर्रचना करण्यात येऊन या महामंडळाला बळकटी देण्यात आली आहे. शासनाने १ हजार ६०० कोटी रुपये मराठा समाजातील विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता दिला आहे. ५०७ विविध अभ्यासक्रम मुलींसाठी विनामुल्य करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

- देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री

यावेळी त्यांनी महाराष्ट्रातील शासकीय, सहकारी, एनबीएफसी बँकांनी मिळून साडे आठ हजार कोटींचे कर्ज वितरण मराठा समाजातील उद्योजकांना केले असून महामंडळाने सुमारे ८५० कोटींचा व्याजपरतावा दिल्याचे नमूद केले.

महामंडळाच्या माध्यमातून कर्ज घेतलेल्या लाभार्थींपैकी ९० हजार पेक्षा जास्त लाभार्थ्यांना प्रत्यक्षात व्याजपरतावा सुरू झाला आहे. आतापर्यंत तब्बल ८३२ कोटी रूपयांचा व्याजपरतावा देण्यात यश आले आहे. एक लाख उद्योजक घडविण्याचा टप्पा पूर्ण केल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सह्याद्री अतिथीगृहामध्ये महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील याचा सत्कार करून महामंडळाच्या कामाचे कौतुक केले.

एकूण लाभार्थी - १ लाख १४

बँकांमार्फत कर्जवाटप ८३२० कोटी

व्याजपरतावा - ८३२ कोटी

परभणी जिल्ह्यातील 2 लाख शेतक-यांना मिळणार 200 कोटींचा थकित पीकविमा

मराठवाड्यातील परभणी जिल्ह्यातील सुमारे २ लाख शेतकऱ्यांना त्यांची २०२१ सालची २०० कोटी रुपयांची पीक विमा देय रक्कम मिळणार आहे. केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या २१ ऑगस्ट रोजी मराठवाडा दौऱ्यात शेतकऱ्यांनी पीक विमा कंपनीच्या आक्षेपामुळे पीकविमा न मिळण्याचा मुद्दा उपस्थित केला होता.

अधिकृत घोषणेमध्ये, कृषी मंत्रालयाने म्हटले आहे की पीक कापण्याच्या प्रयोगांवर विमा कंपनीने घेतलेले आक्षेप त्यांच्या तांत्रिक सल्लागार समितीने (TAC) फेटाळून लावले आहेत. परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी पीक विम्याचे दावे पूर्ण न झाल्याचा मुद्दा केंद्रीय कृषिमंत्र्यांसमोर मांडल्यानंतर मंत्रालयाने २२ ऑगस्ट रोजी TC ची बैठक बोलावली आली होती. TAC ने २४ ऑगस्ट रोजी एका आठवड्याचा वेळ देत विमा कंपनीला थकबाकी निकाली काढण्यास सांगितले.

२०२१ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे खरीप हंगामात पिकांचे नुकसान झाले. परभणी येथील शेतकरी कार्यकर्ते हेमचंद्र शिंदे म्हणाले की, गेल्या तीन वर्षांपासून अनेक शेतकरी पीक विम्याच्या थकबाकीच्या प्रतीक्षेत आहेत. जिल्हा आणि विभाग स्तरावरील विविध अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या बाजूने निकाल दिला होता, परंतु संबंधित पीक विमा कंपनी नकार देत होती. आम्ही केंद्राकडे हा मुद्दा उचलला असता, राज्यस्तरीय TAC ची स्थापना करण्यात आली ज्याने आपला अहवाल सादर केला. हा अहवाल केंद्रापर्यंत पोहोचला असला तरी आमच्या दाव्यांच्या भवितव्याबद्दल आम्ही अनभिज्ञ होतो.

परभणी जिल्हा आणि जवळपासचा भाग सोयाबीन पिकासाठी प्रमुख लागवडीचा पट्टा मानला जातो. २०२१च्या नैसर्गिक आपत्तीने अशा अनेक शेतकऱ्यांना बाधित केल्याचा दावा केला आहे. केंद्रीय मंत्री चौहान यांनी शेतकऱ्यांच्या समस्येचे त्वरित निराकरण केल्याचे स्वागत करताना, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, परभणीतील सुमारे २ लाख शेतकऱ्यांना पीक विम्याच्या दाव्यांचे पैसे लवकरच मिळतील.

ऑगस्टमध्ये झालेल्या चांगल्या पावसामुळे भारतातील खरीप पिकांचे क्षेत्र १०३१ लाख हेक्टरपर्यंत पोहोचले, जे गेल्या वर्षीच्या तुलनेत २% अधिक आहे. तथापि, पूर्व आणि ईशान्य भारतात, विशेषतः बिहार आणि गंगेच्या पश्चिम बंगालमध्ये कमी पावसामुळे पीक क्षेत्र कमी झाले. कडधान्ये पेरणी क्षेत्रात सर्वाधिक वाढ दर्शविली, याचे कारण सरकारी खरेदीवर लक्ष केंद्रित केले आहे. ■

संविधान जागर यात्रा

भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त संविधान जागर समिती महाराष्ट्रद्वारे संविधान जागर यात्रा संपूर्ण राज्यभर काढण्यात येत आहे. भारताच्या संविधानातील कधीच न बदलणारे मुलभूत हक्क आणि संविधानाच्या हत्येचा प्रयत्न करणारी काँग्रेस हे वास्तव आणि यातील विचार संविधान जागर यात्रेच्या माध्यमातून महाराष्ट्रात सर्वदूर पोहोचेल, असा विश्वास भारतीय जनता पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष आणि संविधान जागर समितीचे संयोजक सदस्य ॲड. धर्मपाल मेश्राम यांनी व्यक्त केला आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चवदार तळ्याचा सत्याग्रह केलेल्या महाडच्या भूमीतून ९ ऑगस्ट रोजी संविधान जागर यात्रेचा शुभारंभ झाला. यावेळी ॲड. मेश्राम बोलत होते. मंचावर आमदार भरत गोगावले, संविधान जागर समितीचे संयोजक ज्येष्ठ मानव अधिकार कार्यकर्ता, भाजपा अनुसूचित जाती मोर्चा महाराष्ट्रचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड. वाल्मीक (तात्या) निकाळजे, कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांचे नातू, कर्मवीर दादासाहेब गायकवाड सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र गायकवाड, जयभीम आर्मीचे संस्थापक प्रदेशाध्यक्ष नितीन मोरे, सामाजिक कार्यकर्ते निलेश गद्रे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सहकारी, माजी खासदार बाळासाहेब साळुंके यांचे सुपुत्र काश्यप साळुंके, डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाउंडेशनच्या माजी सदस्या योजनाताई ठोकळे, भाजपा अनुसूचित जाती मोर्चाच्या मुंबई प्रदेश उपाध्यक्ष तथा घे भरारी महिला बचत गटाच्या अध्यक्ष स्नेहाताई भालेराव, जयभीम सेनेचे संस्थापक प्रदेशाध्यक्ष संजय कांबळे, ऐतिहासिक धम्मभूमी ट्रस्ट देहुरोड तथा भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे प्रदेश सचिव राजू माने, फुले, शाहू, आंबेडकरी कार्यकर्ता आकाश अंभोरे, भारतीय सम्यक क्रांती लोककला प्रबोधिनीचे प्रदेश संघटक डॉ. विजय मोरे, बौद्ध युवक संघाचे संस्थापक अध्यक्ष विजय गव्हाळे, भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश सचिव नागसेन पुंडके, ॲड. राहूल झांबरे, संघपाल मेश्राम, डॉ. आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त प्रकाश कांबळे, डॉ आंबेडकर फाउंडेशनच्या सदस्या योजना ठोकळे आदी उपस्थित होते.

९ ऑगस्ट ते ८ सटेंबर २०२४ या कालावधीमध्ये महाराष्ट्रातील विविध ठिकाणी संविधान जागर यात्रा पोहोचेल व तिथे संविधानाच्या मुलभूत हक्काबाबतचे विचार पोहोचविणार आहे. महाड येथील सभेत बोलताना ॲड. धर्मपाल मेश्राम यांनी बाबासाहेबांच्या सर्वांना सोबत घेउन पुढे जाण्याच्या विचाराचा अवलंब करून यात्रा पुढे नेण्याचे आवाहन केले. त्यांनी बाबासाहेबांनी महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह हा ब्राम्हण आणि उच्चवर्णीयांना सोबत घेउन केल्याचे नमूद केले. काँग्रेस मात्र देशात दलित आणि ब्राम्हण, उच्चवर्णीय असा जाणीवपूर्वक भेद पुढे आणत आहे, असे ते म्हणाले. लोकसभा निवडणुकीमध्ये काँग्रेसने संविधान धोक्यात असल्याचा कांगावा करून देशभरातील जनतेला भ्रमित केले. ■

युवा मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षपदी अनुप मोरे

युवा मोर्चा प्रदेशाध्यक्षपदी अनुप मोरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते मोरे यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. यावेळी युवा मोर्चाचे भूतपूर्व अध्यक्ष राहुल लोणीकर, भाजपा प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, माधवी नाईक आदी मान्यवर उपस्थित होती.

काँग्रेसचे माजी आमदार जितेश अंतापूरकर यांचा भारतीय जनता पार्टीत प्रवेश– उपस्थिती– उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, खा. अशोक चव्हाण, माजी खा.प्रताप पाटील–चिखलीकर, आ. तुषार राठोड, ज्येष्ठ नेते राम पाटील–रातोळीकर, प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, विक्रांत पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

अल्पसंख्याक मोर्चातर्फे मुस्लिम महिलांसाठी हेल्पलाइन

भारतीय जनता पार्टी अल्पसंख्याक मोर्चा महाराष्ट्र व मशाल फाउंडेशन मुंबईच्या वतीने राज्यातील मुस्लिम महिलांसाठी गुगल लिंक तयार करण्यात आली आहे. त्यामध्ये राज्यातील मुस्लिम महिलांना दैनंदिन येणाऱ्या अडचणीबरोबर तीन–तलाक व गुजाराभत्ता व शासकीय योजना यासंदर्भात जी मदत हवी असल्यास मशाल फाउंडेशनच्या गुगल लिंकद्वारे https://mashal-foundation.vercel.app या लिंकवर फॉर्म भरून त्या मध्ये आपली संपूर्ण माहिती भरून दिल्यास हवी असलेल्या मदतीसाठी माहिती भरुन दिल्यास महिलेला मदत करण्यात येईल. मदतीसाठी मुस्लिम महिलांची लिगल टिम असणार आहे. त्यांनी मदत मागितली त्यांना त्वरित त्या टीममार्फत मदत दिली जाणार आहे. या लिंकचा ऑनलाईन प्रारंभ १५ ऑगस्ट रोजी माजी प्राचार्य ताजलिम पटेल यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी राज्यातील अल्पसंख्याक मोर्चामध्ये काम करणाऱ्या १०० मुस्लिम महिला पदाधिकारी यांच्या उपस्थितीत उद्घाटन कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी भाजपा अल्पसंख्याक प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी, मुंबई अध्यक्ष वसिम खान, सरचिटणीस रिदा रशिद, जुनेद खान, सलिम जहागिर, अशरफ वंकर, सलिम बागवान, मुश्ताक दळवी, विरु सिंग, मुनावर पटेल आदी राज्यातील पदाधिकारी उपस्थित होते. ■

दर्यापूर अंजनगाव प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक– उपस्थिती– प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, खा. डॉ. अनिल बोंडे, ओबीसी मोर्चा प्रदेश प्रभारी डॉ. आशिष देशमुख, गोपाल चंदन, अनिल कुंडलवार, विजय मेंढे, मदन बायसकर, रवींद्र ढोकणे, सुषमाताई पाचळे, ज्ञानेश्वर महाराज, सतीश काळे आदी.

पंचायतराज प्रकोष्ठ बैठक– उपस्थिती– माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील, प्रदेश सरचिटणीस माधवीताई नाईक, पंचायत राज व ग्राम विकास विभागाचे प्रदेश संयोजक गणेश काका जगताप, प्रदेश सहसंयोजक प्रसाद कुलकर्णी, समाधान गायकवाड, वैशाली नागरे, रोहिदास धुमाळ आदी.

जालना– विस्तारित कार्यकारिणी बैठक– उपस्थिती– माजी केंद्रीय राज्य मंत्री रावसाहेब दानवे–पाटील, प्रदेश उपाध्यक्ष एजाज देशमुख, जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, महानगराध्यक्ष अशोक पांगारकर आदी.

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp

प्रति,

प्रेषक,

कार्यालय मंत्री :

भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई–२०
दूरध्वनी : ०२२–२२०२२०५०, फॅक्स : ०२२–२२८५२३०५
ई मेल– bjpmaha.manogat@gmail.com